पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५० ■ शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# कॅप्टन खरातच्या कुकर्माचा पेटारा उघडला

## 100 पेक्षा जास्त व्हिडीओ असल्याने खळबळ ▶▶ घरच्यांना 2 लॅपटॉप, पिस्तुल आणि काडतुसं मिळाली!

प्रतिनिधी २० मार्च

**नाशिक :** नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या कॅप्टन अशोक खरात प्रकरणात आता अत्यंत धक्कादायक माहिती समोर येत असून, महिलांच्या लैंगिक शोषणाचे १०० हून अधिक व्हिडिओ असल्याचे तपासात समोर आल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या व्हिडिओंमधून 'तांत्रिक विधी' आणि दैवी शक्तींच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याचे समोर येत असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल तपासासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक स्थापन केले असून, आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे. सातपुते यांनी नाशिकमध्ये दाखल होत वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सुमारे दीड तास आढावा बैठक घेतली. या एस आय टी मध्ये नाशिक शहर आणि ग्रामीण भागातील १२ हून अधिक अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. तर कॅप्टन खरात याने महिला अत्याचार केल्याचे १०० हुन अधिक व्हिडीओ असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे.

दरम्यान, पोलिसांनी कॅप्टन खरातच्या विविध ठिकाणी छापेमारी करत महत्त्वाचे पुरावे जप्त केले आहेत. झाडाझडतीदरम्यान दोन लॅपटॉप, सुमारे ८ लाखांची रोकड, एक पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि मालमत्तांची कागदपत्रे हाती लागल्याची माहिती समोर येत आहे. जरी याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी या घडामोडींमुळे प्रकरणाची व्याप्ती वाढल्याचे स्पष्ट होत आहे. या व्हिडिओंचा संबंध शिर्डी प्रकरणातील आरोपी नीरज जाधवशी असल्याचा संशय असून, त्यानेच हे फुटेज काढल्याची शक्यता तपासात पाहिली जात आहे. सध्या कॅप्टन खरातविरुद्ध दाखल तीन गुन्ह्यांचा तपास वेगाने सुरू आहे. सरकारवाडा पोलीस ठाण्यात बलात्कार आणि लैंगिक शोषणाचा गुन्हा, वावी पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा, तर शिर्डी पोलीस ठाण्यात अश्लील फोटो व्हायरल केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. न्यायालयाने खरातला २४ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान खरातने अंकशास्त्र आणि भविष्यकथनाच्या माध्यमातून अनेक राजकीय नेते, अधिकारी आणि प्रभावशाली व्यक्तींशी संबंध निर्माण करून मोठी संपत्ती उभी केल्याचेही समोर आले आहे.



### कोण आहे अशोक खरात?

▶▶ नाशिकमधील सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष असलेला कॅप्टन अशोक खरात हा सेवानिवृत्त आहे. तो अंकशास्त्रज्ञ म्हणून ओळखला जातो. अशोक खरात हा मर्चंट नेव्हीमधील निवृत्त अधिकारी आहे. 'शिवनिका ट्रस्ट'च्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, मर्चंट नेव्हीमध्ये २२ वर्षांच्या कारकिर्दीत खरातने १५४ देशांचे दौरे केले आहेत. त्यामुळे त्या देशांमधील बहुतांश धार्मिक चालीरीती, परंपरा, संस्कृती, नैतिकता आणि नैसर्गिक परिस्थिती यांचा त्याने सखोल अभ्यास केला असल्याची शक्यता आहे. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक भविष्य जाणून घेण्यासाठी तसेच उज्ज्वल भविष्याकरिता करायचे उपाय आदीच्या निमित्ताने अशोक खरातच्या संपर्कात असतात.

### ऑफिसबॉयचा भयानक कट

▶▶ नाशिकमध्ये तथाकथित अंकशास्त्रज्ञ आणि राजकीय वर्तुळात वावर असलेल्या कॅप्टन अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात अटक झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले असून, या संपूर्ण दुष्कृत्याचा खरा मास्टरमाईंड कॅप्टन खरातचा 'खास' व ऑफिसबॉय संशयित नीरज जाधव असल्याचे समोर आले आहे. अशोक खरातने महिलांचे लैंगिक शोषण केले. मात्र त्या शोषणाचे भांडवल करून ५८ महिलांची लाज विकण्याचा डाव नीरजने रचल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून राज्य शासनाने तपासासाठी 'एसआयटी' स्थापन केली आहे.



### सरकारनेच चाकणकर यांना पदावरून हटवावे

▶▶ याचवेळी, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावरही राऊत यांनी टीका केली. खरातसोबत त्यांचे फोटो समोर आल्यानंतर त्यांच्यावर राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. त्या स्वायत्त संस्थेच्या प्रमुख असल्या तरी त्यांची नियुक्ती सरकारनेच केली आहे. त्यामुळे सरकारनेच त्यांना पदावरून हटवावे, अशी स्पष्ट भूमिका राऊत यांनी मांडली. या सर्व घडामोडींमुळे खरात प्रकरण आता केवळ गुन्हेगारी चौकशीपुरते मर्यादित न राहता मोठ्या राजकीय वादळात रूपांतरित होताना दिसत आहे.

### व्हिडिओ सार्वजनिक झाले तर सरकार कोसळू शकते

▶▶ राऊत यांनी पुढे आणखी गंभीर आरोप करत सांगितले की, खरातच्या मोबाईलमध्ये अनेक आक्षेपार्ह व्हिडिओ क्लिप्स सापडल्या असून त्यामुळे सत्ताधारी गटातील काही नेते तणावात आहेत. या प्रकरणात राज्यातील काही मंत्रीही त्याचे भक्त होते. ते त्याच्याकडे जाऊन विचित्र आणि घृणास्पद विधी करत होते, असा आरोप त्यांनी केला. पोलिसांनी जप्त केलेल्या पेन ड्राइव्हमध्ये ५८ व्हिडिओ असल्याचा दावा करत, हे व्हिडिओ सार्वजनिक झाले तर महाराष्ट्रातील सरकार कोसळू शकते, असा धक्कादायक इशाराही त्यांनी दिला.

# जिल्ह्यात अवकाळीचा धुमाकूळ!

## अकोट तालुक्यात गारांसह जोरदार पाऊस, अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित, भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** गुरूवारी रात्री अकोला जिल्ह्याला अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अकोट तालुक्यात गारांसह पावसाने हजेरी लावली. यामुळे रब्बी पिकांसह भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झाले. काही ठिकाणी झाडे पडली. तसेच अकोला शहरासह अन्यत्र रात्री वीज पुरवठा खंडित झाला होता.

गत आठवडा 'हिट वीक' ठरल्याने अकोलेकरांची लाहीलाही झाली होती. मार्चमध्येच ही स्थिती आहे तर एप्रिल आणि मे महिन्यात काय अवस्था होईल, या विचाराने अनेकांना एवढ्या तापमानातही कापरं भरले होते. त्यातच हवामान विभागाने पुढील आठवड्यात अवकाळी पावसाचा इशारा दिला होता आणि तो तंतोतंत खरा ठरत गुरूवारी संध्याकाळपासून जोरदार वारा वाहण्यास सुरूवात झाली. यातच वीज वितरण कंपनीची हानी होऊ नये म्हणून आधीच वीज पुरवठा खंडित केला. जिल्ह्यात दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. परंतु गुरूवारी रात्री त्याचे रूपांतर पावसात झाले. वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अकोट तालुक्यातील सावरा, आसेगाव बाजार, मंचनपूर परिसरात गुरूवारी सायंकाळी गारांसह पाऊस झाला. यामुळे शेतकऱ्यांचे गहू, कांदा, टरबूज पिकांचे प्रचंड नुकसान झाले. नुकसानाने शेतकरी हवालदिल झालेला आहे. काही शेतकऱ्यांची पिके शेतात आहे तर काहींनी कापणी करून खळे करून ठेवले आहे. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास अवेळी आलेला पाऊस हिरावून घेत आहे. यात सर्वाधिक नुकसान आंबा व भाजीपाला पिकांचे झाले आहे. आणखी काही दिवस ढगाळ वातावरण राहील असा अंदाज आहे. त्यामुळे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यातच वीज पुरवठ्याची समस्या निर्माण झाली. शहरातील काही भागांत रात्रभर विजेचे येणे-जाणे चालू असल्याने नागरिकांना डासांचा त्रास सहन करावा लागला. ग्रामीण भागात तर रात्री खंडित झालेला वीज पुरवठा सकाळी १० वाजेनंतरच सुरू करण्यात आला. त्यामुळे अनेक नागरिकांना रात्र डासांच्या सान्निध्यात काढावी लागली. विशेष म्हणजे थोडा जरी वारा, पाऊस आला तरी वीज पुरवठा खंडित होणार हे, नागरिकांनी गृहित धरलेले आहे. आणि यावेळीही तसेच झाले.



### आंबा पिकाचे सर्वाधिक नुकसान

▶▶ सध्या गावरान आंबा कैरी अवस्थेत असून गुरूवारी झालेल्या अवकाळी पावसाने व जोरदार वाऱ्यामुळे आंबा, संत्रा, या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आंब्या कैऱ्यांचा सडा झाडाखाली पडला होता. तसेच कांदा व इतर भाजीपाला पिके, लिंबू यांचेही मोठे नुकसान झाले आहे. यामुळे पुन्हा एकदा शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे.



### राज्यातही अवकाळी पावसाने दाणादाण!

▶▶ राज्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला असून अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नागपूरपासून सोलापूर, नाशिक, जळगाव, बुलढाणा, परभणी, जालना ते बीडपर्यंत अवकाळी पावसाचा तडाखा बसल्याने नागरिकांची धावपळ उडाली. बुलढाणा जिल्ह्यातही वादळी पावसाने मोठे नुकसान केले असून संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर टुनकी परिसरात कांदा आणि गहू पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच मेहकर, लोणार आणि चिखली तालुक्यात गारपिटीसह झालेल्या पावसामुळे केळी, संत्रा, निंबू यांसारख्या फळपिकांसह रब्बी पिकांनाही मोठा फटका बसला आहे.

# रुपाली चाकणकर तंत्रमंत्र विद्या करत होत्या

## सुषमा अंधारे यांचा खळबळजनक आरोप

प्रतिनिधी २० मार्च

**पुणे:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शुक्रवारी अशोक खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर पुन्हा एकदा खळबळजनक आरोप केलेत. रुपाली चाकणकर व भोंदूबाबा अशोक खरात याच्यात घरगुती संबंध होते. त्या तंत्रमंत्र विद्या करत होत्या. यासाठी त्यांनी २ सप्टेंबर २०२४ रोजी सोमवती अमावस्येच्या दिवशी स्वतःची अनामिकाही कापली होती. या प्रकरणी त्यांना तत्काळ अटक झाली पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

सुषमा अंधारे यांनी आज सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी भोंदूबाबा अशोक खरातशी कथित संबंध असल्याप्रकरणी रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची व त्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी त्यांच्या नार्कोटेस्टचीही मागणी केली. त्या एका पीडितेचा दाखला देत म्हणाल्या, रुपाली चाकणकर तंत्रमंत्र विद्या करत होत्या. यासाठी त्यांनी २ सप्टेंबर २०२४ रोजी सोमवती अमावस्येला स्वतःची अनामिक कापली होती. हे कृत्य अशोक खरातपुढे झाले होते. खरातनेच कर्मकांडासाठी त्यांना अनामिक कापण्यास सांगितले होते. त्यातून त्यांच्या बोटाला जखम झाली. ती जखम तब्बल ४ महिने तशीच होती. याचा एक फोटो माझ्याकडे आहे. त्यात चाकणकरांनी अनामिकाला बँडेज लावल्याचे दिसून येत आहे.

सुषमा अंधारे पुढे बोलताना म्हणाल्या, रुपाली चाकणकर व अशोक खरात यांचे घरगुती संबंध आहेत.



### सुषमा अंधारेंना धमकीचे फोन

अंधारे यांनी सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात अनेक महिलांचा लैंगिक छळ झाला. पण भीतीपोटी त्या त्या अद्याप तक्रार देण्यासाठी पुढे येत नाहीत. तपास यंत्रणांनी याची सखोल चौकशी करावी. त्यांच्याकडे तीन पीडित महिलांनी माहिती दिली असून, त्यांना पोलिस संरक्षण पुरवण्याची गरज आहे. मला स्वतःलाही धमकीचे अनेक फोन येत आहेत. पत्रकार परिषदेला येण्यापूर्वी ८ वेगवेगळया नंबरवरून हे फोन आले. त्यात अर्वाच्य शब्दांत शिवीगाळ करण्यात आली. मी याविषयी पोलिसांकडे तक्रार दाखल करणार आहे. खरात याच्या ट्रस्टवरील लोकांची माहितीही या प्रकरणी गोळा केली जात आहे.

# जिल्ह्यातील 76 ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

## 139 जागा रिक्त, 28 एप्रिल रोजी मतदान

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** जिल्ह्यातील ७६ ग्रामपंचायतींमधील १२६ सदस्य व १३ सरपंच अशा एकूण १३९ रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने १७ मार्च रोजी जाहीर केला. त्यानुसार ७ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. तर गरज असल्यास त्या ठिकाणी २८ एप्रिल रोजी मतदान तर २९ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे. विशेष म्हणजे १३ ठिकाणी थेट जनतेतून सरपंच निवडण्यात येणार आहे. राजीनामा, निधन, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ३१ जानेवारी २०२६ अखेर ग्रामपंचायत मधील रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम नुकताच राबविण्यात आला. आधी प्रारूप मतदार यादी प्रसिध्दी नंतर प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तर आता राज्य निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. यामुळे गावपातळीवर राजकीय वातावरण आता तापणार आहे.



### थेट जनतेतून सरपंच निवड होणाऱ्या ग्रामपंचायती

तेल्हारा तालुक्यातील हिंगणी खु, अकोट तालुक्यातील धारगड, वडाळी सटवाई, धामणगाव, बांबर्डा, मूर्तिजापूर तालुक्यातील वडगाव अकोला तालुक्यातील भौरद, सांगवी मोहाडी, बार्शिटाकळी तालुक्यातील परंडा, जनुना, उजळेश्वर, पातूर तालुक्यातील गोंधळवाडी व तुलंगा खु. अशा १३ ग्रामपंचायतीत थेट सरपंच पदांचा पोटनिवडणुकीत समावेश आहे.

### असा राहील निवडणूक कार्यक्रम

| | |
|---|---|
| ◆नामनिर्देशन दाखल करणे | -७ ते १३ एप्रिल |
| ◆अर्जांची छाननी | - १५ एप्रिल |
| ◆उमेदवारी अर्ज माघारी घेणे | -१७ एप्रिल |
| ◆निवडणूक चिन्ह वाटप | -१७ एप्रिल |
| ◆मतदान | -२८ एप्रिल |
| ◆मतमोजणी | -२९ एप्रिल |

# इस्त्राईलकडून सर्वात मोठा नॅचरल गॅस प्रकल्प लक्ष्य!

वृत्तसंस्था २० मार्च

**वॉशिंग्टन :** अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अंधारात ठेवत इस्त्रायलने इराणच्या जगातील सर्वात मोठ्या गॅस प्रकल्पावर हल्ला केला. यानंतर इराणने सात देशातील गॅस आणि उर्जा व्यवस्थांवर मिसाइली आणि ड्रोन डागत जोरदार प्रत्युत्तर दिले. पुन्हा इस्त्रायलने अशी आगळीक केल्यास जबर किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला. यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यापासून हात झटकताना आपल्याला माहीत नाही, अशी प्रतिक्रिया देत इस्त्रायल पुन्हा असे करणार नाही, असे सांगितले.

आता कतारमधील 'रास लाफान' प्रकल्पावरील हल्ल्याचा जागतिक गॅस किमतींवर मोठा परिणाम होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पॅरिसमधील 'सेंटर ऑन ग्लोबल एनर्जी पॉलिसी'च्या तज्ज्ञ ॲन-सोफी कॉर्बो यांनी 'अल जजीरा'शी बोलताना सांगितले की, कतारमधील 'रास लाफान' हा जगातील सर्वात मोठा 'लिक्विफाइड नॅचरल गॅस' (एलएनजी) निर्यात प्रकल्प आहे. या आठवड्यात इराणने केलेल्या हल्ल्यानंतर हा प्रकल्प पुन्हा सुरू होण्यासाठी मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. हल्ल्यामुळे नक्की किती नुकसान झाले आहे हे अद्याप स्पष्ट नसले तरी, इतर ठिकाणच्या अशाच घटनांचा अनुभव पाहता, हा प्रकल्प दुरुस्त व्हायला अनेक महिने लागू शकतात, असे कॉर्बो यांनी म्हटले आहे. २०२२ मध्ये टेक्सासमधील 'फ्रीपोर्ट एलएनजी' प्रकल्प अशाच एका घटनेमुळे ८ महिने बंद होता.

## ५०० किलोचा जनरेटर मुलाच्या पडला अंगावर!

प्रतिनिधी २० मार्च

**नागपूर :** घराजवळून जाणाऱ्या एका मिरवणुकीतील वाहनावरील नियंत्रण सुटले आणि तब्बल ५०० किलो वजनाचा जनरेटर सेट मागे घसरत येऊन थेट चिमुकल्यावर कोसळला. अशा गंभीर अवस्थेत त्याला नेल्सन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याला श्वास घेणे कठीण झाले होते. बालरोगतज्ञ्या डॉ. यश बानाईत यांच्या नेतृत्वाखालील चमूने तत्काळ मुलाला व्हेंटिलेटरवर ठेवले. मात्र, अचानक हृदयाचे ठोके थांबले. मात्र, डॉक्टरांनी हार न मानता जवळपास १०० मिनिटे सलग 'सीपीआर' देऊन त्या मुलाला मृत्यूच्या दारातून सुखरूप परत आणले आहे.

# श्रींच्या मंदिरात श्रीराम नवमी उत्सवाला प्रारंभ

## गुढीपाडवा नविन वर्षाच्या निमित्ताने भाविकांची मांदियाळी

प्रतिनिधी २० मार्च

**शेगाव :** श्री संत नगरी शेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १३२ वा श्रीराम नवमी उत्सवाला दि. १९ मार्च गुरुवार चित्र शुद्ध १ गुढीपाडव्या पासून विविध धार्मिक कार्यक्रम भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला आहे श्रीराम नवमी उत्सवा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

यामध्ये दररोज मंदिरामध्ये सकाळी ६ ते ६.४५ काकडा, ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.१५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० पर्यंत महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे श्रीहरी कीर्तन असे दैनंदिन धार्मिक कार्यक्रम दि. १९ मार्च गुरुवार पासून २६ मार्च गुरुवार असे सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडतील. यामध्ये दररोज रात्री ८ ते १० हरि कीर्तन होणार आहे गुरुवार दि. १९ मार्च रोजी श्रीहरी कीर्तन ह भ प श्रीराम बुवा पाटील मु उंटावर, शुक्रवार दि. २० मार्च रोजी ह भ प लखन बुवा पाटील मु चिंचखेडा. शनिवार दि. २१ मार्च रोजी ह भ प गजानन बुवा काळे मु जुन्नर, रविवार दि. २२ मार्च रोजी ह भ.प ज्ञानेश्वर बुवा वराडे मु शेलुद, , सोमवार दि. २३ मार्च रोजी ह भ प पांडुरंग बुवा आवारकर मु. कातळवा, मंगळवार दि. २४ मार्च रोजी ह भ प ज्ञानेश्वर बुवा काकडे मु. हावरगांव, बुधवार दि. २५ मार्च रोजी ह भ प भगीरथ बुवा काळे मु. सिन्नर, गुरुवार दि. २६ मार्च रोजी ह.भ.प.पडीत बुवा क्षिरसागर मु.श्री क्षैत्र आळंदी दि. २६ रविवार चैत्र शुद्ध ९ श्रीराम नवमीदिनी ह भ प श्री समाधान बुवा शर्मा मु. बिड यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत 'श्रीराम जन्मोत्सवाचे' किर्तन होईल.



### २३ मार्चपासून स्वाहाकार यागास आरंभ

श्रीराम नवमी उत्सव निमित्त अध्यात्म रामायण स्वाहाकारास यागास मिती चैत्र शु ५ सोमवार दि. २३ मार्च आरंभ होऊन चैत्र शु ९ गुरुवार दि. २६ मार्च रोजी श्रीराम नवमीदिनी सकाळी १० वाजता यागाची पुर्णाहुती व अवभृतस्नान होईल. तद्नंतर श्रींच्या मंदिर परिसरातून दुपारी श्रीराम नवमी उत्सवा निमित्त श्रींची पालखी रथ ,अश्वासह , पताकाधारी टाळकरी व वारकरी टाळ मृदुंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात पालखी परिक्रमाकरिता निघेल.

### श्रीराम उत्सवाची सांगता

श्रीराम उत्सवाची सांगता दि २७ मार्च मिति चित्र शुद्ध १० शुक्रवार ला ह भ प प्रमोद बुवा राहाणे मु. पळशी यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे किर्तन व नंतर दहीहंडी गोपाल काला होऊन १३२ व्या श्रीराम नवमी उत्सवाची सांगता होईल.

# भारताचा रुपया रक्तबंबाळ!

वृत्तसंस्था २० मार्च

**नवी दिल्ली :** भारतीय रुपयाने देशाच्या आजवरच्या इतिहासात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली आहे. सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया पहिल्यांदाच ९३ चा टप्पा ओलांडून ९३.१५ या विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या वाढत्या संघर्षामुळे आणि ऊर्जा पायाभूत सुविधा विस्कळीत झाल्यामुळे जागतिक पातळीवर अनिश्चितता निर्माण झाली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या भीतीने 'ब्रेंट क्रूड'चे दर प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. रुपयाची ही घसरण थांबवण्यासाठी आणि त्याला स्थिर करण्यासाठी आता भारतीय रिझर्व्ह बँक बाजारात काही हस्तक्षेप करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. भूराजकीय अनिश्चिततेमुळे जागतिक गुंतवणूकदार 'अमेरिकन डॉलर'सारख्या सुरक्षित पर्यायांकडे वेगाने वळत आहेत, ज्यामुळे डॉलर अधिक मजबूत होत आहे आणि रुपयासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनांवर मोठा दबाव येत आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणावर आपली गुंतवणूक काढून घेत आहेत.

CLASSIFIED

१००% नौकरी

नागपुर, अमरावती मध्ये ऑफिस व एमआयडीसी फॅक्टरीमध्ये १० वी १२ वी, आयटीआय (ऑल ट्रेड) ते पदवीधर पास/नापास मुला/मुलींची भरती. पगार १५००० ते २२००० पर्यंत

शुभम सर

मो. 7350860805 7350713647

सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. २० मार्च २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## महसूल वसुली पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे-विभागीय आयुक्त श्वेता सिंघल

**अमरावती:** राज्य शासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिर अभियानाचा पहिला टप्पा राबविण्यात येत आहे. यातून गावात सुविधा देऊन नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यामुळे विकासात्मक कामाबरोबरच यंत्रणांनी महसूल वसुलीवर लक्ष केंद्रित करून यासाठी आवश्यक असलेले नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी दिले. महाराजस्व अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा नियोजन भवनात घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, धारणीचे उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, परीविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., अपर आयुक्त अजय लहाने, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, सह जिल्हानिबंधक अनिल औतकर, जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी महेश शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

# अमरावतीत एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** शेतकरी संघटना व किसानपुत्र आंदोलन समितीच्या वतीने व विविध संघटनेच्या वतीने एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन स्थानिक पंचवटी चौकातील डॉ. भाऊसाहेब उपाख्य पंजाबराव देशमुख यांच्या पुतळा समोरील जागेत करण्यात आले.

१९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्हातील चिलगव्हाणचे शेतकरी साहेबराव करपे, त्यांची पत्नी मालतीताई व त्यांच्या चार लेकरांनी पवनार जवळच्या दत्तपुर आश्रमात सहकुंटूब आत्महत्या केली होती. १९ मार्चला या घटनेला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याने ४० वा स्मृतिदिन आज होता. यावेळी आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांसाठी सामूहिक श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.




यावेळी राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघ अम, शेतकरी संघटना, अमरावती शेतकरी संघर्ष समिती, अमरावती, आपूलकी संस्था, अमरावती, लोकविकास संघटना, अमरावती., संयुक्त किसान मोर्च्या चे पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी शेतकरी नेते प्रकाश नाना बोंडे, शेतकरी नेते विजय विल्हेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांची ही प्रामुख्याने उपस्थिती होती.

# राजापेठ पोलीसांनी आरोपी कडुन प्राणघातक शस्त्र जप्त करून कार्यवाही

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** सदर प्रकरणाची हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी पोहेकॉ मनीश करपे हे पो. स्टॉफसह पो. स्टे. हददीमध्ये पेट्रोलींग करीत असतांना दिनांक १९.०३.२०२६ चे ०१.३० वा सुमारास मिळालेल्या गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की, केडीया नगर चौक, अमरावती येथे एक इसम हातामध्ये प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुन येणा-या जाणा-या लोकांच्या मनामध्ये दहशत पसरवीत आहे. वरून आम्ही स्टॉफ सह केडीया नगर चौक, अमरावती रोडवर जावुन पाहणी केली असता तेथे एक इसम हातामध्ये शस्त्र घेवुन दहशत पसरवीतांना दिसुन आल्याने त्यांचे कृत्य सोबतच्या पंचांचे निदर्शनास आणुन नमुद इसमाला पो स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेवुन त्याला पंचां समक्ष नाव गाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे प्रेम श्रिकृष्ण कुंजाम, वय २१ वर्षे, रा. गडगडेश्वर मंदिर




जवळ, अमरावती असे सांगीतले. नमुद आरोपीचे ताब्यातुन एक चायना चाकु पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला. वरून आरोपीचे कृत्य कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका अन्वये होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर कार्यवाही दरम्याण आरोपी कडुन एक चायना चाकु ज्याची एकुण लांबी ११.३ इच, पात्याची लांबी ७.६ इंच व मुठची लांबी ३.७ इच असलेला ज्याचे मुठवर डिझाईन असलेला ज्याच्या एका बाजुवर निमुळते धारदार व एका बाजुस मध्यभागी काटेरी टोकदार असलेला व मुठेवर डिझाईन असलेला असा एकुण ६०० रुचा चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, शाम घुगे, पोलीस उपायुक्त परि २ अमरावती, . संजय खटाळे सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पुनीत कुलट, पोउपनी मिलींद हिवरे, पोहेका मनीष करपे, पोहेका पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोका सागर भजगवरे, पोकों अर्जुन कदम यांनी केली आहे.

## अ. भा. अंधश्रध्दा निर्मूलन समिती जिल्हा शाखा अमरावतीची राज्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** ८ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत अमरावती जिल्हा शाखेच्या बळकटीकरणावर आणि आगामी वर्षाच्या कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विज्ञान युगाकडे समाज वाटचाल करत असताना, समाजाला अंधश्रद्धेकडे वळविण्याचे प्रयत्न करणाऱ्या घटकांना प्रतिष्ठा मिळणे चिंताजनक आहे. अशा परिस्थितीत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारे वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न निर्णायक ठरत आहेत, असे प्रतिपादन राज्य संघटक भाऊ पाथोडे यांनी केले.

बैठकीत अमरावती जिल्ह्यात अंधश्रद्धा विरोधातील शिलेदारांच्या प्रयत्नांवर संघटनेचा विस्तार तालुका स्तरावर करणे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी सक्रिय चमू तयार करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश आहे या मुद्द्यावर

कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे यांनी प्रकाश टाकला. यावेळी राज्य कार्यकारिणी सदस्यांनी सर्व सदस्यांची नोंदणी मोहीम राबविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे हा सांगितले आणि जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना त्वरित ऑनलाइन नोंदणी करण्याचे आवाहन केले. जिल्हा संघटक शेखर यांनी प्रस्तावना करतांना जिल्ह्यातील कामाचा आढावा सादर केला.

राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य अॅड. गणेश हलकारे यांनीही वर्तमान चिंताजनक राजकीय सामाजिक परिस्थिती मुळे संघटन विस्तार करणे किती आवश्यक आहे यावर विचार मांडले. बैठकीची अध्यक्ष डॉ बबनराव बेलसरे यांनी सर्वसामान्य जनतेपर्यंत परिवर्तन पोहचविणे, सर्वांना सोबत घेऊन कार्य करणे यावर भाष्य केले.

यावेळी जिल्ह्यातून आलेले प्रा शरद जंजाळ, मंगेश खेरडे, राजीव खिराडे ज्येष्ठ सदस्यांनीही आपले विचार मांडले. सूत्रसंचालन हरीश केदार यांनी केले. सर्वानुमते जिल्हा कार्यकारणीत काही फेरबदल करण्यात आलेत.


यावेळी विदर्भ समन्वयक सुधीर हांडे आडे व सुनील वंजारी उपस्थित होते. बैठकीला महेश कथलकर, अर्थव पवार, शुभम शेरेकर, सुषमा कुलकर्णी, रविंद्र निघोट, पुरुषोत्तम दाहेदार, विजय कुलकर्णी, प्रकाश कळसकर, रवी निघोट, निलेश कंचनपुरे तसेच जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आनंदी चेहरा म्हणजे आनंदी जीवन

♦ मौखिक आरोग्य म्हणजे काय? ♦ साखर आणि आम्लयुक्त पदार्थांचे सेवन मर्यादित करा ♦ आज जागतिक मौखिक आरोग्य दिन

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** जागतिक मौखिक आरोग्य दिन २०२६ हा २० मार्च २०२६ रोजी साजरा केला जाईल. काही लोक म्हणतात की या तारखेला संख्यात्मक महत्व आहे. उदाहरणार्थ प्रौढाना त्यांच्या आयुष्याच्या शेवटी २० नैसर्गिक दात असले पाहिजेत आणि मुलांनाही २० दात असले पाहिजेत. मौखिक आरोग्य हा निरोगी दात आणि हिरड्यांचा आयुष्यभराचा प्रवास आहे. उज्वल हास्याकडे जाण्याचा प्रवासाचा आनंद घ्या. निरोगी हास्य केवळ चांगल्या तोंडी स्वच्छतेचे प्रतिबिंबीत करत नाही तर ते आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग देखील वाढवू शकते. World oral herlth day म्हणजेच जागतिक मौखिक आरोग्य दिन २०२६ ची थीम ? आनंदी तोंड म्हणजे आनंदी जीवन .



ही थीम मौखिक आरोग्य आणि एकूणच कल्याण यांच्यातील मजबूत संबंध अधोरेखित करते. निरोगी दात आणि हिरड्या खाण्यात, बोलण्यात आणि आत्मविश्वासाने हसण्यात महत्वाची भूमिका बजावतात. मौखिक आरोग्य लक्षात घेता, दिवसातून दोन वेळा दात घासणे गरजेचे आहे. फ्लोराईडयुक्त टूथपेस्ट आणि मऊ ब्रिस्टल असलेला टूथब्रश वापरून दोन मिनिटे दात स्वच्छ करा. झोपण्यापूर्वी ब्रश करणे विशेषतः प्लाक आणि अन्नाचे कण काढून टाकणे महत्वाचे आहे.

दररोज फ्लॉस केल्याने दातांमधील अन्नाचे अवशेष आणि प्लेक निघून जातात, जिथे टूथब्रश पोहोचू शकत नाही. यामुळे हिरड्यांचे आजार आणि पोकळी टाळण्यास मदत होते. यासोबतच वेळोवेळी माऊथवॉशचा वापर करणे सुद्धा महत्वाचे ठरते. अँटी माइक्रोबियल किंवा फ्लोराईडयुक्त माऊथवॉश बॅक्टरिया कमी करण्यास, इनामल मजबूत करण्यास आणि श्वास ताजेतवाने करण्यास मदत करू शकते. ब्रशिंग आणि फ्लॉसिंगसाठी ते पूरक म्हणून वापरले पाहिजे, बदली म्हणून नाही.

जास्त साखर आणि आम्मलयुक्त पदार्थ दातांच्या मुलामा चढवणे कमकुवत करतात आणि दात किडण्यास कारणीभूत ठरतात. असे पदार्थ खाल्यानंतर पाणी पिल्याने त्यांचा परिणाम कमी होण्यास मदत होते. भरपूर पाणी पिल्याने अन्नाचे कण आणि बॅक्टरिया धुण्यास मदत होते, तोंड स्वच्छ राहते आणि कोरडे तोंड टाळता येते, ज्यामुळे पोकळी निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. दातांची योग्य निगा राखण्यासाठी दंत वैद्याला नियमितपणे भेट देणे अनिवार्य आहे, तसेच दंत तपासणी करणे सुद्धा गरजेचे आहे. नियमित तपासणी आणि व्यावसायिक स्वच्छता दंत समस्या लवकर शोधण्यास आणि त्यांचे निराकरण करण्यास मदत करते. भविष्यात अधिक गंभीर समस्या टाळण्यास ही बाब साधक ठरते. दात म्हणजेच जन्मभराची साथ होय. चला तर मग आज दातांचे संरक्षण करण्यासह त्यांची काळजी घेण्यासाठी मग आजच प्रतिज्ञा करू या. दिवसातून दोनदा ब्रश करा. दर तीन महिन्यांनी टूथब्रश बदला. गोड पदार्थांचे सेवन कमी करा आणि नियमितपणे दंत तपासणी करा. ज्याप्रमाणे आपण शरीराची काळजी निगा राखतो त्याचप्रमाणे तुमचे तोंड स्वच्छ आणि निरोगी असायला हवे. मौखिक आरोग्य राखण्यासाठी आपल्या हिरड्यांची काळजी घेणे महत्वाचे आहे. पण ही काळजी कशाप्रकारे घेता येते ते आज आपण जाणून घेऊयात. माऊथवॉश जीवाणू नष्ट करण्यास मदत करते, श्वास ताजे ठेवते. अशा महत्वपूर्ण टिप्स देताना मौखिक आरोग्य जपा, असा अनमोल संदेश देण्यासह अमरावती येथील दंत शल्य चिकित्सक - डॉ. सय्यद अबरार यांनी दिली.

# जिल्हास्तरीय जनगणना प्रशिक्षणाचा समारोप

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती:** जनगणना २०२७च्या अनुषंगाने नियोजन भवनात जिल्हास्तरावरील तीन दिवसीय प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षण वर्गाचा आज समारोप करण्यात आला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, महापालिका उपायुक्त योगेश पिठे, सहआयुक्त विकास खंडारे, जिल्हा सूचना अधिकारी मनिषकुमार, अधिक्षक निलेश खटके, प्रशिक्षणाचे मार्गदर्शक जनगणना संचालनालाचे सहायक व्यवस्थापक प्रविण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, मास्टर ट्रेनर तहसिलदार मयूर कळसे, अक्षय मंडवे उपस्थित होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. काकडे यांनी जनगणना ही देशातील योजना राबविण्यासाठी उपयुक्त ठरत असते. त्यामुळे प्रशिक्षणात सहभागी झालेल्यांनी अचूक नोंद घ्याव्यात, असे आवाहन केले. यावेळी परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी सोनल सुर्यवंशी, मनोज शहाळे, तांत्रिक सहायक चेतना चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षणासाठी जणगणना कक्षाच्या राधिका देशमुख यांनी सहकार्य केले. भावना जिचकार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# अमरावती महानगरपालिकेत फिशरीज हब प्रकल्पासंदर्भात आढावा बैठक

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज शुक्रवार दिनांक १३ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेत फिशरीज हब प्रकल्पासंदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत प्रकल्पाची सद्यस्थिती, भविष्यातील कार्ययोजना, प्रकल्पाची व्यवहार्यता तसेच विविध प्रशासकीय बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान फिशरीज हब प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात मासेमार संघटना, संस्था तसेच संबंधित व्यावसायिक यांच्या सहभागातून प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रकल्पाचे संचालन, व्यवस्थापन व दीर्घकालीन उपयोगिता लक्षात घेता मासेमार संघटना, सहकारी संस्था तसेच व्यवसायिकांकडून प्रस्ताव मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित घटकांचा सहभाग वाढवून प्रकल्पाला अधिक चालना देण्याबाबत आयुक्तांनी निर्देश दिले. सर्व पाचही जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त मत्स्य विभागांना मत्स्य उत्पादनाबाबत तसेच कार्यक्षेत्रातील तलाव बाबत माहिती सादर करण्याचे निर्देश दिले.

# विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १३ जानेवारीच्या अधिसूचनेत सुधारणा करण्याची मागणी

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** उच्च शिक्षण व्यवस्थेत समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोग यांनी १३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत सुधारणा करण्याची गरज असल्याचे निवेदन देण्यात आले. हे निवेदन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्यामार्फत सादर करण्यासाठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांना देण्यात आले.

राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाच्या वतीने जिल्हा संयोजक प्रफुल्ल मंदा श्रीधर यांच्या अध्यक्षतेखाली हे निवेदन देण्यात आले. या वेळी नरेंद्र धर्माळे (अध्यक्ष, शिक्षण बचाव समन्वय समिती, अमरावती), विजय डवरे (संविधान जागर अभियान, अमरावती), संदीप यादव, मो. अफसर भाई (अमरावती) तसेच सामाजिक कार्यकर्ते महेश ढवळे



(यवतमाळ) उपस्थित होते.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, सदर अधिसूचनेत अधिनियम, आयोग, समता, पीडित व्यक्ती, जातीय आधारित भेदभाव, संस्था प्रमुख, कर्मचारी, उच्च शिक्षण संस्था, लोकपाल, विद्यार्थी अशा महत्त्वाच्या संज्ञांचा अर्थ स्पष्टपणे नमूद केलेला नाही. त्यामुळे अधिसूचनेची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना उच्च शिक्षणात समान संधी मिळण्यासाठी आवश्यक तरतुदी स्पष्टपणे समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. उच्च शिक्षण घेत असताना एखाद्या विद्यार्थ्यावर किंवा व्यक्तीवर भेदभावाची घटना घडल्यास त्याबाबतची चौकशी व कार्यवाही जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत पूर्ण व्हावी, अशीही सूचना या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यासंदर्भात सविस्तर चर्चा करून अधिसूचनेत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# सराफा बाजारसह ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात खरेदीसाठी ग्राहकांची रेकार्डब्रेक गर्दी

- सोन्याचा दर काहीही असो मुहूर्ताला सोने खरेदीसाठी ग्राहकांची ब्रँडेड शो रूमला पहिली पसंती
- कुर्ता - पायजामा, पैठणी साडी, रेडिमेड नववार पातळ खरेदीसाठी ग्राहक सहकुटुंब बाजारपेठेत दाखल
- साडे तीन मुहूर्तापैकी एक असलेला गुडीपाडव्याचा उत्साह अमरावती शहरात दिसून आला
- २५० ते ३०० सिसीच्या बाईक खरेदीला तरुणाईची खास पसंती

प्रतिनिधी २० मार्च

**अमरावती :** साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेला गुडीपाडव्याचा उत्साह गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी अमरावती शहरात दिसून आला. या सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल झाल्याचे चित्र यावेळी दिसून आले. हिंदू नववर्षाचा हा मुहूर्त साधत ग्राहकांनी यावेळी मोठ्या प्रमाणात विविध वस्तूंची खरेदी केली. सराफा बाजारसह रिअल इस्टेट, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात यावेळी खरेदीसाठी ग्राहकांनी एकच गर्दी केली होती. गुडी पाडव्याला दरवर्षी ग्राहक सोने खरेदी करत असतात. गुडीपाडव्याचे औचित्य साधून विविध स्वर्णअलंकार खरेदीला घेऊन ग्राहकांनी यावेळी आपल्या चोखंदळ निवडीचा परिचय विक्रेत्यांना करवून दिला होता. तसेच नवीन घरात प्रवेश करणे वा दुचाकी - चार चाकी वाहन विकत घेण्यासोबतच इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे आणि फर्निचर आदींची खरेदीसाठी ग्राहकांमध्ये एकच चढाओढ सुरु होती. या अनुषंगाने



बाजारपेठा देखील सज्ज झाल्या होत्या. इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर शोरूमने गुढी पाडव्यासाठी कंबर कसली असल्याने विविध सवलतींचा वर्षाव कंपन्यांद्वारे जाहीर करण्यात आला असल्यामुळे ग्राहकवर्गाचे इलेक्ट्रॉनिक्स व फर्निचर खरेदीला घेऊन एक आगळेवेगळे आकर्षण यावेळी दिसून आले. त्याचप्रमाणे रेडिमेड - गारमेंटच्या दुकानांमध्ये गुडीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र गर्दीच - गर्दीच दिसून आली. यंदा गुडीपाडवा आणि रमजान एका दिवसाच्या अंतराने आले आहेत. त्यामुळे बाजारात अधिकाधिक उत्साह दिसून आला. रेडिमेड - गारमेंटच्या खरेदीसाठी ग्राहक सहपरिवार आल्याने आपल्याकडील विविध व्हेरायटीज दाखविण्यासाठी विक्रेते व त्यांचे सहकारी व्यस्त झाले होते. गेल्या काही वर्षामध्ये गुडी पाडव्याच्या दिवशी मंगलवेश परिधान करून सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचा ट्रेंड वाढला आहे. त्यामुळे साहजिकच कुर्ता - पायजामा, पैठणी साडी, रेडिमेड नववार पातळ यांची विक्री वाढली आहे. हाच ट्रेंड यंदाही कायम आहे. त्याचा फायदा रेडिमेड गारमेंट सेक्टरला होत असल्याची यावेळी व्यापारी बांधवानी प्रांजळपणे कबुली दिली. ऑटोमोबाईल सेक्टरचा विचार करता इलेक्ट्रिक व्हेईकलला मागणी वाढली आहे. परिणामतः नववर्षाचा मुहूर्त साधत इलेक्ट्रिक वाहन घरी आणण्यासाठी ग्राहकांमध्ये एकच उत्सुकता दिसून आली. यासोबतच मोपेड - बाईक या दुचाकी खरेदीला घेऊन दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दुचाकी खरेदीसाठी ग्राहकांचा चांगलाच प्रतिसाद लाभला असल्याचे यावेळी विक्रेत्यांनी सांगितले. गेल्या तीन वर्षात बाईक घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. विशेषतः २५० ते ३०० सीसीच्या बाईक घेणाऱ्या तरुणांचे प्रमाण वाढल्याने बाईकला तरुणाईची अधिकाधिक पसंती असल्याचे दृश्य यावेळी दिसून आले. तसेच सोन्याचा दर काहीही असो मुहूर्तावर सोनेखरेदी होणार हे निश्चित आहे. गेल्या दहा वर्षातील सोने खरेदीचा उत्साह बघता दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा गुडी पाडव्याला सोने खरेदीसाठी अमरावती शहरातील ब्रँडेड शोरूममध्ये ग्राहकांची न भूतो न भविष्यती अशी गर्दी दिसून आली. गेल्या काही दिवसांमध्ये सोने - चांदीचा दर वर - खाली राहिला आहे. तरीही सोने खरेदी कमी झालेली नाही. लग्नसराईमुळे सोने खरेदी करण्याकडे यावेळी अनेकांचा कल दिसून आला. तसेच रिअल इस्टेट क्षेत्रावर एक कटाक्ष टाकला असता, अमरावती शहराच्या चोहोबाजूला गगनचुनबी इमारतीचे बांधकाम सुरु आहे. काहींचे बांधकाम पूर्ण होऊन गृहप्रवेश सुरु झालेले आहेत. गगनचूनबी इमारतीनशिवाय टू - बीएचके, थ्री - बिएचके, फोर - बीएचके फ्लॅट स्कीमचे काम सुरु आहे. एक कोटिहून अधिक किंमतीच्या फ्लॅटची विक्री आता नवीन राहिलेली नाही. याचा फायदा रिअल इस्टेट क्षेत्राला मिळणार आहे.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अकोल्यात ईद-उल-फित्रची नमाज २ जमातीत होणार

**अकोला :** शहरातील कच्छी मशिदीत यंदा ईद-उल-फित्रची नमाज दोन वेगवेगळ्या जमातीत अदा करण्यात येणार आहे. ही माहिती कच्छी मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष जावेद झकारिया यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की शव्वालचा चंद्र दिसल्यानंतर ईदची नमाज अदा करण्यात येईल. पहिली जमात सकाळी ८:४५ वाजता होणार असून, त्यामध्ये मुफ्ती मोहम्मद सादिक अख्तर रझवी मरकजी नमाज अदा करून घेतील. तर दुसरी जमात सकाळी ९:४५ वाजता होणार असून, तिचे इमामत नायब इमाम मौलाना आरिफ रझा करतील. कच्छी मस्जिद ट्रस्ट यांच्या वतीने नमाज अदा करणाऱ्या नागरिकांना वेळेचे भान ठेवून मशिदीत वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून नमाजची व्यवस्था सुरळीत पार पडेल. शेवटी ट्रस्टच्या वतीने सर्व नागरिकांना ईदच्या आगाऊ शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## अकोल्यात २८-२९ मार्चला अमृतपेठ थेट बाजारपेठ

**अकोला:** स्थानिक उद्योजकांना सक्षम व्यासपीठ मिळावे आणि नागरिकांना दर्जेदार उत्पादने थेट उत्पादकांकडून खरेदी करता यावीत, या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीतर्फे (अमृत) 'अमृतपेठ थेट बाजारपेठ- हा उपक्रम २८ व २९ मार्चला अकोल्यात होईल.

या विशेष बाजारपेठेत स्वादिष्ट खाद्यपदार्थ, ट्रेंडी व पारंपरिक कपडे, घरगुती उपयोगाच्या वस्तू, कलात्मक हस्तकला, दागदागिने तसेच अनेक स्थानिक उत्पादनांचा समावेश या प्रदर्शनात असेल. त्यामुळे खरेदीप्रेमींसाठी हा एक वेगळाच आणि आनंददायी अनुभव ठरणार आहे. मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय, अकोला यांच्या अंतर्गत मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये नामांकित तज्ज्ञ डॉक्टर चा मार्फत नागरिकांना सेवा देणार आहेत.

## हलक्या पावसाने जुन्या शहरातील बत्ती गुल

**अकोला :** गुढीपाडव्या च्या रात्री महानगरात हलका पाऊस पडला. सुदैवाने वारावादळ नव्हते. परंतू यामुळे जुन्या शहरातील वीज पुरवठा एका तासाच्या वर खंडीत झाला होता. तसेही याभागात वीजेचा लपंडाव सुरु झाला आहे.

जुन्या शहरातील विजेची समस्या निवारण केल्याचे महावितरण कंपनीचे अधिकारी सांगत असले तरी त्यात तथ्य नसल्याचा अनुभव वीज ग्राहकांना येतो आहे.

जुन्या शहरातील वीज पुरवठा खंडीत झाल्यास चेंजओव्हर द्वारे दहा मिनिटांत सुरु करण्यात येतो असे कंपनीचे म्हणणे आहे. हा झाला समस्येवरिल तोडगा. परंतू वारंवार वीजपुरवठा खंडीत होण्याचे कारण मात्र गुलदस्त्यातच आहे. त्याचा शोध घेऊन समस्येचे कायमस्वरुपी निराकरण करावे, अशी वीज ग्राहकांची मागणी आहे.

## निधन वार्ता

### वत्सलाबाई सावरकर



**अकोला :** डाबकी रोडवरील काळे नगर निवासी श्री पुरुषोत्तम सावरकर यांच्या आई श्रीमती वत्सलाबाई लक्ष्मणराव सावरकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज २० मार्च २०२६ रोजी दुपारी ४ वाजता गुलजार पुरा मोक्षधामला निघणार आहे. त्यांच्या मागे बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# सावरा रंभापूर परिसरात पिकांचे प्रचंड नुकसान

प्रतिनिधी २० मार्च

**अकोट:** तालुक्यामधील सावरा, आसेगाव, मंचनपूर, वडाळी देशमुख व रंभापुर परिसरामध्ये गारासह अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे बागायती शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले. गावामध्ये पाण्याचे डबके साचल्याने नागरिकांची तारांबळ उडाली.

सावरा रंभापुर, वडाळी देशमुख गावांमध्ये गुढीपाडव्याचा शुभमुहूर्त शेतकऱ्यासाठी कर्दनकाळ ठरला. १९ मार्चला सायंकाळी जोराचा पाऊस झाला. बोराएवढी गार पडली. अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला बागायती पिकाचा घास हा निसर्गाने हिसकावून घेतला आहे. टरबूज वेल गारीच्या माराने तुटले व टरबूज सुद्धा जमीनदोस्त झाले. गहू पिकांच कंबरडे मोडले. केळीच्या परिपक्व घडाला गारीचा मार





### तात्काळ पंचनामे नुकसान भरपाईची मागणी

लागल्याने केळी सुद्धा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. शेतातील कांद्याचे पीक भिजले. कांदा गारीच्या माराने तो सडण्याच्या मार्गावर आहे. लिंबू व आंबा झाडावरील लहान फळे सुद्धा गळून पडली.

अवकाळी पावसाने व गारीच्या माराने झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी अशी सर्व शेतकरी बांधवांची ओरड आहे. गोपाल हुसे, मंगेश बोडखे, सचिन वैतकार, दुर्गेश शिंगाडे, बंडूभाऊ बोडके, अजित देशमुख, मयूर पोटदुखे, मदन हाडोळे, नितीन सपकाळ, एकनाथ महल्ले, माधव साबळे, उषाताई गीते, अविनाश गीते, अर्जुन लोणारे, पुरुषोत्तम अंबडकार, संजय खलोकर, छोटू गीते, बाबुराव गीते, यावेळी प्रचंड परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तरी प्रशासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी.

दोन एकर टरबूज लागवडीला दोन लाखाच्या वर खर्च लागला ऐन तोडणीच्या वेळेस गारा जोराच्या पावसाने टरबूज मातीमोल झाले,

**नितीन सपकाळ, टरबूज उत्पादक, सावरा**

--------------------

गव्हाची ओंबी भरण्याच्या वेळी अवकाळी गारांचा व पावसाच्या तळाख्यात गहू जमीनदोस झाला एकरी वीस क्विंटल पोत्याचे नुकसान झाले आहे,

**अर्जुन लोणारे, शेतकरी रंभापुर**

--------------------

चार एकर केळीच्या बनातील केळीची पाने फाटली आहेत. त्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. सरकारने झालेल्या गारपिटीचे नुकसान भरपाई द्यावे.

**बंडूभाऊ बोडखे,** शेतकरी वडाळी देशमुख

## माळवी सुवर्णकार महिला मंडळाकडून महिला दिवस साजरा

प्रतिनिधी २० मार्च



**अकोला:** महिला दिन निमित्त संत शिरोमणी नरहरी महाराज मंदिर गुडधी येथील सभागृहात झाला. प्रमुख अतिथी म्हणून माजी अध्यक्ष उषाताई अनासाने यांनी महिलांना मार्गदर्शन केले. कार्यकारिणीतील सर्व महिलांचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या व बक्षीस देण्यात आले. नीलिमाताई गोगटे यांनी उत्कृष्ट स्त्रीची महती कविता वाचून महिलांना उद्बोधन केले. अध्यक्षा डॉ. माधुरीताई सोनी यांनी महिला सशक्तिकरण गरजेचे आहे हा संदेश देऊन स्त्रीबद्दल काव्यात्मक ओवी सांगितल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुष्पाताई करूले, मनीषाताई अनासाने, सीमाताई पिंजरकर, रेखाताई शेरेकर ,दिपाली माथने, सुचिता अनासाने, मनीषा बुटे, वर्षा तारापुरे, राधा ठोसर, नेहा अनासाने यांनी विशेष प्रयत्न केले शुभांगी पिंजरकर, प्रणाली बुटे, प्रार्थना मांडळे ,वर्षा सागडे, रंजना करुले ,उमा प्रांजळे व महिलांची उपस्थिती होती.

## भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांच्या मागणीला यश, शिक्षणाधिकारी यांचे आदेश

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील खाजगी शाळांवर काम करणाऱ्या शिक्षकांना सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत व दरमहा वेतन प्रमाणपत्र मिळत नसल्याची तक्रार भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांच्याकडे काही शिक्षकांनी केली होती. यावर मनीष गावंडे यांनी अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक यांना पत्र देऊन विभागातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत व धर्मा वेतन प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासंदर्भात निर्देश देण्याबाबत विनंती केली होती.

यावर शिक्षण उपसंचालक निलिमा टाके यांनी तात्काळ कारवाई करून विभागातील पाचही शिक्षणाधिकाऱ्यांना मनीष गावंडे यांच्याकडून प्राप्त निवेदनावर तात्काळ शासन नियमानुसार कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

शिक्षण उपसंचालक यांच्याकडून प्राप्त सूचनेनंतर अकोला प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांनी आदेश काढून शिक्षकांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत व दरमहा वेतन प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासंदर्भात वेतन पथक



अधीक्षक व जिल्ह्यातील अंशतः व अनुदानित शाळेतील मुख्याध्यापकांना आदेशित केले आहे.

शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या आदेशामध्ये खाजगी शाळा संहिता १९८१ मधील नियम ३९ नुसार सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत, महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ नुसार रजा लेखा अद्यावत करणे व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार दरमहा वेतन प्रमाणपत्र देऊन प्रशासकीय जबाबदारीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले मुख्याध्यापक व वेतन पथक अधिक्षक यांना दिले.

शिक्षकांच्या प्रश्नावर तत्परता दाखविल्याबद्दल शिक्षण उपसंचालक निलिमा टाके व प्राथमिक शिक्षणाधिकारी पवार यांच्यासह शिक्षण विभागातील अजय गावंडे, उपसंचालक कार्यालयातील किशोर कामनकर यांनी सहकार्य केल्याबद्दल मनीष गावंडे यांनी आभार व्यक्त केले.

## पातोंडा शिवारात पतीकडून पत्नीची हत्या

वि.प्रतिनिधी २० मार्च

### नववर्षदिनी घडली धक्कादायक घटना





**कुटासा:** दहीहांडा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पातोंडा गावाच्या शेतशिवारात पतीने पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मेंढपाळ व्यवसायासाठी आलेल्या पती-पत्नीमध्ये झालेल्या वादातून हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दाम्पत्य काही दिवसांपासून पातोंडा परिसरात मेंढपाळ व्यवसायासाठी वास्तव्यास होते. दरम्यान, किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने संतप्त झालेला पती योगेश रघुनाथ ठोंबरे रा.पूरणार ता.मुक्ताईनगर जि. जळगाव याने पत्नी सौ.सपणा योगेश ठोंबरे वर जीवघेणा हल्ला करत तिची हत्या केली.

घटनेची माहिती मिळताच दहीहांडा पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. आरोपी पतीला ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, घटनेची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी निखिल पाटील यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. कामे राबविण्यात येणार आहेत. योजनेत गावाची निवड कृषी आयुक्त स्तरावर होते. निवडीसाठी शिफारस जिल्ह्यातून करण्यात आली. योजनेबाबत जनजागृती करून अधिकाधिक गावांचा समावेश होण्यासाठी प्रयत्न करावा, असे निर्देश देण्यात आले.

## गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात सभागृहाचे भूमिपूजन

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला:** गुढीपाडव्याच्या दिवशी न्यू तापडिया नगरातील संत श्री गजानन महाराज, हनुमान मंदिर प्रांगणात आमदार रणधीर सावरकर, भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने यांच्या हस्ते सभागृहाचे भूमिपूजन करण्यात आले. नगरसेवक प्रशांत जोशी, बबलू भाऊ जगताप, हरीश काळे, सागर शेगोकार व श्री हनुमान मंदिर विश्वस्त उपस्थित होते. न्यू तापडिया नगर मधील नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन हभप गजानन मालठाणकर यांनी केले.



## हिवरखेड येथे ७३ हजारांचा प्रतिबंधित पान मसाला गुटखा जप्त

प्रतिनिधी २० मार्च



**अकोला:** हिवरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुटखा विक्री व साठवणुकी विरोधात मोठी कारवाई करण्यात आली. १९ मार्च रोजी दुपारी आरोपीच्या घरी छापा टाकण्यात आला. आरोपी अब्दुल मुसद्दिक अब्दुल नजीक रा. पेठपुरा, हिवरखेड याच्या ताब्यातून प्रतिबंधित पानमसाला व गुटखा असा एकूण ७३,२४०/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई केली. आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखा निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनात खाली ही कारवाई उपनिरीक्षक विष्णू बोडखे आणि सहका-यांनी केली.

## आदर्श गाव योजनेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात चर्चा

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला:** आदर्श गाव योजनेत निवडीसाठी जिल्ह्यातून पातूर तालुक्यातील खानापूरचा प्रस्ताव कृषी आयुक्तांकडे पाठविण्यात येणार आहे. त्यासंबंधी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत निर्णय झाला. आदर्श गाव योजनेबाबत बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली. प्र. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, कृषी अधिकारी विलास वाशिमकर यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

आदर्श गाव योजनेत पातूर तालुक्यातील खानापूर येथील प्रस्ताव प्राप्त झाला. त्याबाबत सादरीकरण



कृषी विभागातर्फे करण्यात आले. सेवाधर्म शिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून कामे राबविण्यात येणार आहेत. योजनेत गावाची निवड कृषी आयुक्त स्तरावर होते. निवडीसाठी शिफारस जिल्ह्यातून करण्यात आली. योजनेबाबत जनजागृती करून अधिकाधिक गावांचा समावेश होण्यासाठी प्रयत्न करावा, असे निर्देश देण्यात आले.

**ग्रामपंचायत कार्यालय हातरुण**

ता. बाळापूर, जि. अकोला, पिन ४४४१०९

**आठवडि बाजार हर्राशीची जाहिर सुचना**

ग्राम पंचायत कार्यालय हातरूण ता. बाळापूर, जि. अकोला सर्वत्र जनतेस या जाहिर सुचने द्वारे कळविण्यात येते की हातरून ग्रामपंचायतच्या मालकिचा आठवडी बाजार फि वसुलीचा ठेका व जनावर विक्रि नोंदणी फि वसुलीचा ठेका सन २०२६ २०२७ या वर्षा करिता दिनांक ०१/ ०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ या कालावधी करीता दिनांक २४ मार्च २०२६ मंगळवारी रोजी सकाळी ठिक ११ अकरा वाजता ग्राम पंचायत कार्यालय हातरूण येथे जाहिर लिलावाने हर्रास करण्यात येणार आहे व तसेच RO फिल्टरचा हि लिलाव करण्यात येईल बोली बोलण्या पुर्वी वसुली फि करीता रुपय १० .००० अनामत नगदि भरावी लागेल.तरी हर्रास घेवु इच्छिणाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे. हर्रासीत बोली बोलनाऱ्यांनी बोली बोलण्यापूर्वी भाजी बाजार वसुली फि करीता रुपये १५००० /- अनामत नगदि भरावी लागेल आणि जनावर विक्री नोंदणी फि वसुली करीता अनामत रक्कम रुपये १०,०००/- नगदी भरावी लागेल. त्या शिवाय बोली बोलता येणार नाही हर्रास कायम झाल्यानंतर हर्राशीची पूर्ण रक्कम त्याच वेळेत त्या दिवशी नगदि भरावे लागेल त्यासाठी वेळ दिल्या जाणार नाही याची संबंधित ठेकेदारांनी नोंद घ्यावी

हररास बाबतच्य नियम व अटी ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील तसेच नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत

**टिपः** हर्राशीची योग्य किंमत न आल्यास हर्रास कायम करणे किंवा रद्द करणे बाबतचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.

**विनीत**

**वाय. टी. कापकर**
**ग्रामपंचायत अधिकारी**

**प्रशासक ग्रामपंचायत हातरुण**
**सरपंच हुजैफा परवीन सैय्यद काजीम अली**

**संध्या भास्कर डोंगरे, उपसरपंच**

**तथा सर्व सनमाननीय प्रशासकिय समिति सदस्य, सदस्या, ग्रामपंचायत, हातरुण**

## मुर्तीजापुरात शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक; सण उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० मार्च

**मुर्तीजापूर :** शहर पोलीस स्टेशन येथे आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. रमजान ईद, रामनवमी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या सणांच्या अनुषंगाने ही बैठक घेण्यात आली .

या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांनी उपस्थित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध



संघटनांच्या प्रतिनिधींना कायदा व सुव्यवस्थेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सणांच्या काळात कोणतीही अफवा पसरू नये, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा, तसेच कोणत्याही प्रकारच्या वादाला आळा घालण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मुर्तीजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांनीही उपस्थितांना संबोधित करताना सण-उत्सव हे शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे करण्याचे आवाहन केले. कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी आपले मत मांडत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. शहरात शांतता व सौहार्द टिकवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सणांच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क असून नागरिकांनीही जबाबदारीने वागून शांतता राखावी, असे आवाहन या बैठकीतून करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष हर्षल साबळे नगरसेवक इब्राहिम घाणीवाला, विनायक गुल्हाने आनंद बांगळ कृष्णराव गावंडे संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संजय गुप्ता सद्दाम पटेल कमलाकर गावंडे अब्दुल कुद्दूस सुनील पवार पत्रकार अन्वर खान अमोल पिंपळे रवींद्र इंगळे निजाम इंजिनियर बाळासाहेब खांडेकर चंद्रकांत तिवारी माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे आरिफ ठेकेदार तसवर खान भैय्यासाहेब तायडे व इतर शांतता कमिटीचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २० मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळ नगर परिषद घनकचरा निविदा प्रकरण तापले

**नगरसेवक संतोष बोरले यांचे गंभीर आरोप, चौकशीची मागणी**

प्रतिनिधी २० मार्च

**यवतमाळ :** नगर परिषद यवतमाळमधील घनकचरा व्यवस्थापन कामाच्या निविदा प्रक्रियेवरून नवा वाद निर्माण झाला आहे. नगरसेवक संतोष बोरले यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत प्रशासनावर नियमबाह्य पद्धतीने निविदा राबविण्याचे आणि विशिष्ट कंत्राटदाराला लाभ देण्याचे गंभीर आरोप केले आहेत.

बोरले यांनी सांगितले की, या निविदेसाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी तसेच बजेट तरतूद नसतानाही प्रक्रिया सुरू करण्यात आली.

यापूर्वी या निविदेला शासनाने स्थगिती दिली असतानाही, पुन्हा त्याच प्रकारे निविदा काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेत त्यांनी विविध मुद्दे उपस्थित करत, निविदेचे अंदाजपत्रक, मंजुरी प्रक्रिया, निधीची उपलब्धता, तसेच कामगारांच्या वेतन व सामाजिक सुरक्षा (EPF, ESIC) बाबतही प्रश्न उपस्थित केले. किमान वेतन कायद्याचे पालन होत आहे का, याबाबतही स्पष्टता मागण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भ्रष्टाचाराच्या शक्यतेकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून काय स्पष्टीकरण दिले जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एम्पॅनेलमेंट प्रक्रियेवर आरोप ; निविदा न काढता दिले कंत्राट

**यवतमाळ :** नगर परिषद यवतमाळमध्ये कंत्राटदारांच्या एम्पॅनेलमेंट प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप नगरसेवक संतोष बोरले यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात, निविदा न काढता निवडक कंत्राटदारांना कोट्यवधींची कामे देण्यात आल्याचा दावा करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. बोरले यांच्या म्हणण्यानुसार, मुख्याधिकारी यांनी प्रशासकीय काळात नियमबाह्य पद्धतीने एम्पॅनेलमेंट करून कंत्राटदारांची निवड केली आणि निविदा प्रक्रियेचे उल्लंघन करत कामांचे आदेश दिले. या प्रक्रियेमुळे नगर परिषदेचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. निवेदनात त्यांनी एम्पॅनेलमेंटसाठी घेतलेले ठराव, निविदा व जाहिराती, निवड प्रक्रियेची कागदपत्रे, तसेच कामांचे आदेश आणि त्यासंबंधित प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या प्रती मागितल्या आहेत. याशिवाय, शहरातील विविध भागांमध्ये करण्यात आलेल्या डांबरीकरण आणि पॅचवर्क कामांच्या दर्जावरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. पॅचवर्क कामांची सद्यस्थिती, त्यांची दोषदायित्व (defect liability) कालावधी, तसेच निकृष्ट काम आढळल्यास संबंधित कंत्राटदारांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबतही माहिती मागण्यात आली आहे. या प्रकरणामुळे नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## करपे यांचा स्मृतीदिन ; चिलगव्हाण येथे अन्नत्याग आंदोलन

प्रतिनिधी २० मार्च



**महागाव :** तालुक्यातील चिलगव्हाण येथे शेतकरी हुतात्मा साहेबराव शेषराव करपे यांच्या स्मृतीदिनानिमित्त अन्नत्याग आंदोलन आयोजित करण्यात आले. या आंदोलनाला खासदार संजय देशमुख यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी करपे यांच्या तेलचित्राला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. साहेबराव करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली होती. महाराष्ट्रातील ही पहिली नोंद झालेली शेतकरी आत्महत्या मानली जाते. त्यांच्या या बलिदानामुळे राज्यातील शेतकरी प्रश्नांकडे संपूर्ण समाजाचे लक्ष वेधले गेले होते.

स्मृतीदिनानिमित्त चिलगव्हाण येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून करपे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उपस्थित शेतकऱ्यांनी शासनाने शेतकरी समस्यांवर गांभीर्याने विचार करून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. तसेच करपे यांच्या बलिदानाची आठवण ठेवून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एकत्रित लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान गावात श्रद्धांजलीपर वातावरण निर्माण झाले होते. करपे यांच्या कार्याचा व त्यागाचा उल्लेख करून उपस्थितांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. यावेळी खासदार संजय देशमुख, शेतकरी नेते मनीष जाधव, विनायकराव देशमुख, मराठा सेवा संघाचे संदीप शिंदे, शिवसेना नेते भीमराव भालेराव, नायब तहसीलदार पराते, सरपंच प्रभावती प्रमोद काळे, पोलीस पाटील लक्ष्मण बोरकुट, उपसभापती बाळू करपे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ६०० ब्रास रेती साठा जप्त

प्रतिनिधी २० मार्च

**यवतमाळ :** डोर्ली शेतशिवारात अवैधरित्या ६०० ब्रास रेतीचा साठा जप्त करून इतरत्र हलवत



असताना महसूल पथकाने धाड टाकून कारवाई केली. या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी अमित चौधरी यांनी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी नाजीर मोहम्मद साहब (रा. यवतमाळ) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला. सदर रेतीसाठा जप्त करण्यात आला आहे. रेतीचे अवैध उत्खनन करून चोरटी वाहतूक करीत आहे. काहीजण साठवणूक करून रेतीची विक्री करीत असल्याने महसूलचे नुकसान होत आहे.

## २२ मार्चला चाळणी परीक्षा

प्रतिनिधी २० मार्च

**यवतमाळ :** शासनामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश मार्गदर्शन योजना राबविण्यात येत असून त्यासाठी २२ मार्च रोजी चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी या परिक्षेसाठी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागातंर्गत शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, ईएमआरएस अंतर्गत इ.११ वी व इ.१२ वीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करुन घेण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना १० वी नंतर २ वर्ष कालावधीकरीता नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या सहाय्याने शासकीय आश्रमशाळेमध्ये अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविण्यास शासनाव्दारे मंजुरी प्राप्त झाली आहे. या मार्गदर्शन वर्गाकरीता निवड करण्याकरिता चाळणी परीक्षा २२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा चिचघाट ता.जि.यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यालयात तसेच प्रत्यक्ष किंवा मुख्याध्यापक प्राचार्य यांनी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना दि. २२ मार्च रोजी चाळणी परीक्षेस परीक्षा स्थळी सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन पांढरकवडा येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमित रंजन यांनी केले आहे.



## मंत्री संजय राठोड यांनी उभारली गुढी

■ **यवतमाळ :** गुढीपाडव्याच्या निमित्ताने राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी गुरुवारी येथील निवासस्थानी गुढी उभारली. यावेळी त्यांनी नागरिकांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा देत हिंदू नववर्ष सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि निरामय आरोग्य घेऊन येवो, अशी प्रार्थना व्यक्त केली. याप्रसंगी पोहरादेवी येथील महंत श्री जितेंद्र महाराज, जिल्हा बँकेचे संचालक राजुदास जाधव तसेच कुटुंबीय व स्नेही उपस्थित होते.

## गुढी उभारून शेतकऱ्याच्या नव्या वर्षाला सुरुवात

प्रतिनिधी २० मार्च

**महागाव :** महागाव परिसरात गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी नववर्षाची सुरुवात असलेल्या या दिवशी शेतकरी वर्गाने गुढी उभारून नव्या वर्षाचे स्वागत केले.

गुढीपाडवा हा चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी साजरा होणारा महत्त्वाचा सण असून, याला साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त मानले जाते. घराघरांमध्ये गुढी उभारून, तोरण लावून आणि गोडधोड पदार्थांचा आस्वाद घेत आनंद साजरा करण्यात आला.



गुढीपाडव्यामागे पौराणिक आणि ऐतिहासिक संदर्भही आहेत. प्रभू श्रीराम १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले, तेव्हा त्यांच्या विजयाचे प्रतीक म्हणून गुढी उभारली जाते, अशी श्रद्धा आहे. तसेच ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टीची निर्मिती केली, असे मानले जाते.

गुढी उभारण्याची परंपरा आजही जपली जाते. बांबूच्या काठीला कडुनिंबाची डहाळी, रेशमी वस्त्र, साखरेच्या गाठी व फुलांचा हार बांधून त्यावर कलश ठेवून गुढी उभारली जाते. या दिवशी कडुनिंब, ओवा, मीठ, हिंग, मिरी व साखर यांचा प्रसाद म्हणून सेवन केला जातो. त्यामुळे आरोग्यदायी फायदे होतात, असे मानले जाते.

शेतकरी बांधवांनीही नव्या वर्षाची सुरुवात नव्या उत्साहात केली. शेतात लक्ष्मीपूजन करून नव्या मशागतीचा श्रीगणेशा करण्यात आला. काही ठिकाणी कुटुंबासह 'साधनी' म्हणून जेवणाचीही परंपरा पाळण्यात आली.

रब्बी हंगामातील कापणीचा हा काळ असल्याने निसर्गातही नवचैतन्य दिसून येत आहे. गुढीपाडवा हा सण आनंद, समृद्धी आणि नव्या सुरुवातीचे प्रतीक मानला जातो.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शेंबाळपिंपरी येथे अन्नत्याग आंदोलन

प्रतिनिधी २० मार्च

**पुसद :** शेंबाळपिंपरी येथे १९ मार्च रोजी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर लक्ष वेधण्यासाठी एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन आयोजित करण्यात आले. राज्यातील शेतकरी समस्यांचे अभ्यासक अमर हबीब यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे हे आंदोलन याही वर्षी पार पडले.



आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पटांगणात पार पडले. त्याची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून करण्यात आली. या वेळी डॉ. नंदकुमार देशमुख, डॉ. अजित चंदेल, हुस्नोदीन सिद्दीकी, मंगेश भाऊ पारटकर, गुलाबराव वाहुळे आणि अन्य अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

त्यानंतर शेंबाळपिंपरी ग्रामपंचायतीचे सरपंच रवींद्र महल्ले यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या प्रमाणावर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या समस्यांवर अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. शेतकरी संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष जैनुल भाई सिद्दीकी यांच्या प्रास्ताविकानंतर, निवृत्ती वाहुळे, डॉ. राहुल सिरसाट, जनार्दन वाहुळे, बापुराव कांबळे यांसह अनेक नेत्यांनी शेतकरी समस्यांवर आपले मंतव्य व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हे आंदोलन शांततेत पार पडले आणि ठाणे पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## डॉ. सुफियान मिर्झा यांचे डीएम कार्डियोलॉजीत यश

प्रतिनिधी २० मार्च

**आर्णी :** जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर आर्णी येथील डॉ. सुफियान बैग लुकमान बैग मिर्झा यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे डीएम कार्डियोलॉजीमध्ये प्रवेश मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे येत त्यांनी हे यश मिळवले. मर्यादित साधनसामग्री असलेल्या कुटुंबातून येणाऱ्या डॉ. सुफियान यांनी स्वतःच्या कष्टाच्या जोरावर हा टप्पा गाठला. त्यांचे वडील लुकमानबैग मिर्झा हे जिल्हा परिषद शाळा, तेंडोली येथे शिक्षक असून आई अरिफजान मिर्झा या प्राथमिक शाळा, उमरी (इजारा) येथे शिक्षिका आहेत.

डॉ. सुफियान यांची शैक्षणिक वाटचाल उज्ज्वल राहिली असून त्यांनी एमबीबीएस व एमडी मेडिसिन या दोन्ही परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केल्या आहेत. त्यानंतर देशभरातील सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांनी दिलेल्या सुपर स्पेशालिटी प्रवेश परीक्षेत त्यांनी ऑल इंडिया रँक १७०० मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

वैद्यकीय क्षेत्रात कार्य करताना हृदयविकारग्रस्त रुग्णांवर उपचार करून विशेषतः गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सेवा देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

त्यांचे धाकटे बंधू डॉ. अदनान मिर्झा सध्या एमबीबीएसच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहेत. कुटुंबीयांनी या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही प्रेरणादायी कामगिरी असल्याचे सांगितले जात आहे.

## गोंड पंच कमिटी समाजाची बैठक ; समाजाच्या परंपरांची जपणूक करण्याचा निर्धार

प्रतिनिधी २० मार्च

**झरी :** तालुक्यातील माथार्जुन येथील गुढीपाडवा निमित्त गोंड समाजाची पारंपरिक बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत गोंड समाजाच्या विविध परंपरांचे जतन आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. प्रत्येक वर्षीप्रमाणे गोंड समाजाच्या मान्यवर व्यक्तींची निवड या दिवशी पारंपरिक पद्धतीने केली जाते. महाजन, घट्या, कारभारी व भुमका यांचा समावेश असलेल्या या बैठकीमध्ये समाजातील एकोपा आणि शिस्त राखण्यासाठी प्रमुख पदांची निवड करण्यात आली.



गोंड समाजामध्ये निसर्गपूजा, देव-देवतांची पूजा, साधेपणा आणि एकोपा या सर्व परंपरा आजही जपल्या जात आहेत. समाजातील न्यायव्यवस्था आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया या परंपरांचा आदिवासी संस्कृतीतील महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. या बैठकीत, समाजातील किरकोळ वादांचे निवारण करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची निवड देखील करण्यात आली, ज्यामुळे समाजातील वादविवादांची शिस्त आणि सुसंस्कृतता राखली जाते.

बैठकीत गुढीपाडव्याच्या दिवशी पाटण आई देवस्थानाच्या व्यवस्थापनासाठी आणि समाजाच्या विविध उपक्रमांसाठी एकत्र रक्कम जमा करण्याचा निर्णय घेतला गेला. यासाठी पुजारी म्हणून लालशहा तुमराम यांची नियुक्ती करण्यात आली.

महाजन पदासाठी मनोहर मेश्राम, घट्या पदासाठी संतोष तुमराम, कारभारी पदासाठी अरविंद नैताम आणि भुमका पदासाठी धर्मा गेडाम यांची निवड करण्यात आली. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी गोंड पंच कमिटीचे सदस्य एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला विशेष सहकार्य म्हणून विलास किनाके सर, योगेश मडावी, बाबुलाल किनाके, सज्जन कोडापे आणि अन्य समाजबांधव उपस्थित होते.

## बोरगाव नाल्यात रेती माफियांची जत्रा

प्रतिनिधी २० मार्च

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील बोरगाव नाल्याच्या परिसरात रेती तस्करीचा प्रचंड आलेला वेग, प्रशासनाच्या निष्क्रियतेला पुन्हा एकदा प्रश्नांकित करतो आहे. पैनगंगा अभयारण्याच्या सीमेसाठी महत्वाचे असलेल्या या नदीपात्रात अवैधरीत्या रेती उपसा करण्यात येत आहे, ज्यामुळे पर्यावरणाला तसेच स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांनाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

या अवैध तस्करीमध्ये 20 ते 25 ट्रॅक्टरधारकांचा मोठा गट सक्रिय आहे. यामध्ये भवानी, अमडापूर, घमापूर, नारळी, बोरगाव, डोंगरगाव, रामपूर, खेडी, सोईट आणि घडोळी या गावांमधून रेती तस्करी करणारे ट्रॅक्टरधारक सामील आहेत. यामध्ये भवानी येथील ट्रॅक्टरधारकांची संख्या सर्वाधिक आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांना नुकसान पोहोचवणारी ही रेती तस्करी न थांबता, त्याची जणू काही स्पर्धा सुरू झाली आहे.

रेती तस्करी करणाऱ्यांना पैनगंगा नदीपात्रातील अपुरी रेती पुरवठा असावा म्हणून बोरगाव नाल्यात 200 मीटरपर्यंत रस्ता तयार केला आहे. याचा उपयोग करून नाल्याच्या मध्यभागातून रेती उपसली जात आहे. हे सर्व वनविभागाच्या चार नाके - खरबी, चिखली



(वन), घमापूर फाटा, टेंभुरदरा आणि दराटी पोलीस स्टेशन व महसुल विभागाच्या देखरेखीत होऊ होत आहे, परंतु यावर प्रशासन किंवा संबंधित विभागकडून कोणतीही कार्यवाही होत नाही.

स्थानिक नागरिकांना आश्चर्य आहे की या सर्व अवैध कामकाजाला वनविभाग, पोलीस व महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांची साक्ष आहे, तरीही या तस्करीला थांबवण्याच्या दृष्टीने काहीही पावले उचलली जात नाहीत. या बाबी प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे प्रतीक बनत आहेत.

या अवैध उपसाच्या दरम्यान, पिकांवर होणारे दुष्परिणाम स्पष्ट आहेत. शेतकरी आपली रब्बी पिके देखरेख करण्यासाठी मेहनत घेत असताना, त्यांचे पिक शंभर-दीडशे एकरांवर नष्ट होतात. या परिस्थितीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने जलद पावले उचलावी अशी स्थानिकांची मागणी आहे. या परिस्थितीचा गंभीर विचार करत, नागरिकांचा विश्वास प्रशासनावर तुटत चालला आहे. रेती तस्करीच्या या कृत्यामुळे लाखो रुपयांचे महसूल नुकसान होत आहे, जे राज्याच्या अर्थव्यवस्थेला हानिकारक ठरू शकते. प्रशासनाच्या अशा निष्क्रियतेमुळे निसर्ग आणि स्थानिक शेतकऱ्यांवर वाढते संकट अनियंत्रित होण्याची शक्यता आहे.

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. २० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# शिक्षण विभागात भ्रष्टाचार नेक...
# करा चेक, घोटाळे अनेक!




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शिक्षणाधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मागतिल्याचा व्हिडीओ शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी सोशल मिडीयावर व्हायरल केल्यानंतर शिक्षण विभाग पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला. कथित उपशिक्षणाधिकारी आणि शिक्षण विभागातील सर्व गैरकामे वरिष्ठांकडून मार्गी लावणाऱ्या बासरीवाल्या शिक्षकाची भागिदारी असल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे. या दोघांचीही शासनाने एसआयटी चौकशी केल्यास वाशीम जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील विविध भागातील शिक्षण विभागातील अनेक घोटाळे उघडकीस येण्याची शक्यता असल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे.

*** कथित उपशिक्षणाधिकाऱ्याची गैरकामात बासरीवाल्याशी भागिदारी**
*** शासनाने एसआयटी चौकशी केल्यास अनेक घोटाळे उघडकीस येण्याची शक्यता**
*** संस्थानिक लोकप्रतिनिधींचे अर्थपूर्ण दुर्लक्ष**

वाशीम मध्ये कथित उपशिक्षणाधिकाऱ्यास नोकरीसाठी येण्याला जवळपास १४ वर्षाचा काळ झाला आहे. या १४ वर्षाच्या कार्यकाळात वाशीम नगर पालिकेत शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी पदी तब्बल १२ वर्षापेक्षा अधिक कार्यरत राहण्याचा पराक्रमही कथित अधिकाऱ्याने पुर्ण केला आहे.त्या १२ वर्षात सात वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ माध्यमिक शिक्षण विभागात प्रभारी उपशिक्षणाधिकारी, प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणून पदावर राहण्याचा पराक्रमसुद्धा त्यांनी केल्याची नोंद शिक्षण विभागाकडे नमूद करण्यात आली आहे. पालिकेत असो की शिक्षण विभागात असो भ्रष्टाचाराची सवय लागलेल्या अधिकाऱ्याने शिक्षकांकडून सेवासातत्य, निवडश्रेणी, पदोन्नती, प्रभार देणे व ईतर शैक्षणिक कामासाठी दाम घेतल्याशिवाय कोणतेही काम केले नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पुर्वी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षक असलेल्या आणि सद्या वाशीम पालाकेच्या शाळेवर कागदोपत्री हजेरी लावून दररोज पुणे, मुंबई ला शिक्षण विभागातील गैरप्रकारातील कामे मार्गी लावण्यात या 'बासरीवाल्या' शिक्षकाचा हातकंडा असल्याचे समजते. हा बासरीवाला शिक्षक शिक्षणाधिकाऱ्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदल्या करणे, झालेली बदली रद्द करणे, चौकशी थांबविणे, संच मान्यता मॅनेज करून देणे, टीईटी परीक्षेत पास करून देण्यासह अनेक गैरप्रकार करून दरवर्षी कोट्यवधीच्या आसपास वरकमाई करत असल्याची चर्चा आहे.




एवढेच नव्हे तर ही जोडगोळी वाशीमला त्यांच्या मर्जीतील अधिकारी आणण्यासाठी, डोक्याच्या वर असलेल्या अधिकाऱ्याची उचलबांगडी करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत असल्यामुळे या कथित भ्रष्ट जोडीने कोट्यवधीची कमाई करून मोठ्या प्रमाणात अपसंपदा जमा करून त्या अपसंपदेतुन शेती, प्लॉट, फ्लॅट, सोने - चांदीचे दागिणे खरेदी केल्याची जाणकारांमध्ये चर्चा आहे.

या जोडगोळीचे मोबाईल लोकेशन तपासल्यास त्यांची हजेरी कुठे होती? आणि त्यांनी या कार्यकाळात त्यांनी केलेल्या संपर्कासह विविध गैरप्रकाराची मालिका जगजाहीर होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीमध्ये कथित उपशिक्षणाधिकाऱ्याकडे अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात प्रशासन अधिकाऱ्याचा प्रभार आहे.अमरावती विभागाच्या महिला शिक्षण उपसंचालक त्यांच्या भ्रष्ट कार्यप्रणालीने राज्यात बदनाम झालेल्या आहेत.आता त्यांच्या भ्रष्ट कारभाराच्या ज्ञानात जास्तीची भर टाकून कथित उपशिक्षणाधिकाऱ्याने वरकमाईत आकाशभरारी घेतल्याची सर्वत्र चर्चा आहे.

## थोडक्यात

### ग्राहक हक्कांविषयी जागरूकतेचा संदेश



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**वाशिम तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा**

तहसील कार्यालयाच्या नवीन सभागृहात १७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा), तहसील कार्यालय व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी होते. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर उपस्थित होत्या. तसेच मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव ॲड. सुधीर घोडचर यांच्यासह महिला प्रतिनिधी संगीता इंगोले, संघटनमंत्री प्रांजलकुमार जैन, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष वृषाली टेकाळे, मंगरूळचे तालुकाध्यक्ष संजय राठी, जेष्ठ सदस्य गजाननराव साळी, तहसीलदार निलेश पळसकर, नायब तहसीलदार प्रतिभा चौधरी, निरीक्षण अधिकारी मनोज लटारे, सदस्य प्रदीप टाकळकर, मिलींद इंडेन गॅस एजन्सीचे प्रतिनिधी मिलींद सोनोने, श्री बालाजी भारत गॅस एजन्सीचे प्रतिनिधी आशिष हुरकट व रास्तभाव दुकानदार संघटनेच्या तालुकाध्यक्ष प्रेमा सोमानी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार निलेश पळसकर यांनी केले. सूत्रसंचालन कनिष्ठ लिपीक अनिता देशमुख यांनी तर आभार कनिष्ठ लिपीक निकिता घुगे यांनी मानले.कार्यक्रमास ॲड. पवन भंसाली, गजानन व्यवहारे, अरविंद भगत, प्रमोद लक्रस, सय्यद इरफान, सोनाली गर्जे, नामदेवराव बोरचारे, जगदीश बोरा, सुनिल महाजन, भुषण देशपांडे, वसंतराव इंगोले यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद व ग्राहक पंचायत कार्यकारिणीचे सदस्य, स्वस्त धान्य दुकानदार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराची चतुःसुत्री, देखभाल दुरूस्ती कागदोपत्री !

***कार्यकारी अभियंता व ठेकेदाराची भागिदारी * ३ कोटी ४० लाखाची विल्हेवाट लावण्याची तयारी**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम येथील सार्वजनिक विभागातील कार्यकारी अभियंता शुभम जोशी व त्यांची मर्जी सांभाळून भ्रष्टाचार करणाऱ्या चौकडीने ३१ मार्च २०२६ पुर्वी शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या तिन कोटी चाळीस लाख रुपयाची कागदोपत्री वाट लावून करोडपती होण्याचा संकल्प केल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे.





वाशीम शहरातील ३४ शासकीय निवासस्थानाच्या देखभाल, दुरूस्तीसाठी प्रत्येकी १० लाख रूपये प्रमाणे एकूण तिन कोटी चाळीस लाख रूपयाचा निधी जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झाला आहे.हा निधी ३१ मार्च २०२६ पुर्वी खर्च न झाल्यास हा निधी शासनाकडे परत जातो.या कोट्यवधीच्या निधीतून आपणही कोट्यवधीची वरकमाई करण्यासाठी सा.बां.विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी पुढाकार घेतला. या ३४ कामाचे वितरण शासन निर्णयाप्रमाणे ३३३ गुणोत्तरात करण्याची गरज होती.परंतु या ३४ कामात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून स्वत:ची व मर्जी सांभाळणाऱ्या ठेकेदारांची तुंबडी भरण्यासाठी शासन आदेशाला बाजूला सारून ही ३४ कामे जोशी यांनी मर्जी सांभाळणाऱ्या विश्वासू लोकांना वितरीत करून प्रत्येक कामात जोशी यांची भागिदारी असल्याची बांधकाम विभागात चर्चा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात काम पुर्णझाल्यानंतरच त्या कामाचे देयक संबंधित ठेकेदाराला देण्यात येते.मात्र, या देखभाल, दुरूस्तीच्या कामात कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांनी सर्व कामासाठी प्रत्येकी ६०३ रक्कम म्हणजेच एका कामासाठी सहा लाख रूपये अग्रिम देवून या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होणार असल्याचे सिद्ध करून दिले आहे. या सर्व गैलप्रकाराची वरिष्ठांनी दखल घेवून दोषींवर फौजदारी कारवाई करावी अशी मागणी अन्याय झालेल्या मंडळीकडून होत आहे.




# शहरातील ९४० लक्ष रुपयांच्या रस्ता कामांना मंजुरात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात विकास योजना अंमलबजावणी मध्ये वाशिम जिल्ह्यातील ५१ कोटी रुपयांचे कामे प्रस्तावित करण्यात आली होती. यामध्ये वाशिम शहरातील ९ कोटी ४० लक्ष रुपयांच्या कामाचा समावेश आहे. सदर कामांना लवकरच मंजुरात मिळणार आहे अशी माहिती शिवसेना नेत्या आ. भावनाताई गवळी पाटील यांनी दिली आहे. भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्याप योजना ही केंद्र सरकारने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी दिलेली एक विशेष योजना आहे. या योजनेअंतर्गत, राज्यांना ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. या निधीचा उपयोग आरोग्य, शिक्षण, सिंचन, पाणीपुरवठा, वीज, रस्ते, पूल आणि रेल्वे यासह विविध क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी करता येते. या योजनेअंतर्गत, केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये १६ राज्यांना ५६,४१५ कोटी रुपये प्रदान केले आहेत. वर्ष २०२५-२६ करिता आ. भावनाताई



गवळी पाटील यांनी १० सप्टेंबर २०२५ रोजी वाशिम जिल्ह्यातील रिसोड, वाशिम, कारंजा व मंगरूळपीर नगरपरिषद आणि मालेगाव व मानोरा नगरपंचायत अंतर्गत ५१ कोटी रुपयांची कामे संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग पुणे यांच्याकडे प्रस्तावित केली होती. यामध्ये वाशिम शहरातील पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण व अनुषंगिक कामे करणे - ५ कोटी, प्रभाग क्रमांक १५ मधील वाळकी फाटा ते वाळकी पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - १ कोटी, प्रभाग क्रमांक ८ मधील नगरपरिषद शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे - ४९ लक्ष, प्रभाग क्रमांक ५ मधील हरिओम नगरातील व्यवहारे यांचे घर ते डॉ. चरखा यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - ६० लक्ष, प्रभाग क्रमांक ४ मधील महात्मा गांधी शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे - ७० लक्ष, प्रभाग क्रमांक ७ मधील रिसोड मेन रोड ते सोनखास पर्यंतच्या (डिपी) रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - १ कोटी आणि जुनी नगरपरिषद इमारत ते राजनी चौक पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - ७० लक्ष रुपये या कामाचा समावेश आहे.

# शेतकऱ्यांनी केला जीवनत्याग...
# भूमीपुत्राचा अन्नत्याग !



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून दरवर्षी १९ मार्चला अन्नत्याग आंदोलन केले जाते. व्यवस्थेने दखल घेतलेली पहिली शेतकरी आत्महत्या १९ मार्च १९८६ ला झाली होती. यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे आणि त्यांच्या कुटुंबाने कर्जबाजारीपणा आणि समाजाचे व व्यवस्थेचे प्रचंड दुर्लक्ष यामुळे सहकुटुंब आत्महत्या केली होती. तेव्हापासून आतापर्यंत लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली देण्यासाठी आणि शेतकऱ्यांप्रती सहवेदना समर्पित करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटना दरवर्षी १९ मार्चला अन्नत्याग आंदोलन करीत असते. याही वर्षी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून राज्यभर अन्नत्याग आंदोलनाची हाक देण्यात आली होती. भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर




यांच्या नेतृत्वामध्ये रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांच्या वतीने अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. सकाळी बारा वाजता सुरू झालेले अन्न त्याग आंदोलन सायंकाळी चार वाजेपर्यंत चालले. यावेळी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना भूमिपुत्र कडून श्रद्धांजली वाहण्यात आली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर निवेदन तयार करण्यात आले असून हे सरकारला पाठवले जाणार आहे. अन्न त्याग आंदोलनासाठी डॉक्टर जितेंद्र गवळी, जिल्हाध्यक्ष रामेश्वर आवचार, निवासी जिल्हाध्यक्ष संतोष सुर्वे, सचालक रवींद्र चोपडे, जिल्हा कार्याध्यक्ष बालाजी पाटील बोरकर, रिसोड चे तालुकाध्यक्ष श्रीरंग नागरे, गजानन जाधव, अमर दहीहंडे, गजानन पाटील सदार, वैजनाथ रंजवे, रवी पाटील जाधव, महावीर सिंह




# कसब्यातील प्लॉट नंबर सोळा, नोंदीसाठी पैशावर डोळा !

**गुंतागुंतीच्या प्रकरणात वरिष्ठांचे मार्गदर्शन नाही, तलाठ्याची नोंदीसाठी घाई...**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील महसूल विभागाअंतर्गत येणाऱ्या कसबे रिसोड भाग - १ येथील सर्व्हे नंबर १/३ मधील प्लॉट नंबर १६ ची फेरफार नोंद विवादित असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले असल्याची माहिती प्लॉटचे ताबेदार प्रदीप खंडारे यांनी दिली आहे. मात्र या प्रकरणात सबंधित ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) आर्थिक चिरीमिरी घेऊन फेरफार नोंद प्रमाणित करण्यासाठी धडपड करत असल्याचा आरोप खंडारे यांनी केला आहे. परिणामी या गुंतागुंतीच्या प्रकरणात सबंधित ग्राम महसूल अधिकारी यांनी वरिष्ठांचे कुठलेही मार्गदर्शन घेतले नाही, मग फेरफार नोंद घेण्याची एव्हढी घाई का ? असा सवाल हरकतदार प्रदीप वसंता खंडारे यांनी उपस्थित केला आहे.

प्राप्त माहितीनुसार कसबे रिसोड भाग - १ येथील सर्व्हे नंबर १/३ मधील प्लॉट नंबर १६ हा मूळमालक इंदिराबाई त्र्यंबकराव पांडे यांचे मालकी व ताब्यातील होता. सदर प्लॉटच्या कायदेशीर मालक असलेल्या इंदिराबाई यांनी तो १६ नंबरचा प्लॉट दस्तुरखुद दि.१८ नोव्हेंबर १९६४ रोजी कायमस्वरूपी मालकी ताबेपावतीनुसार वसंता अर्जुन खंडारे



यांना विक्री केला. सदरचा व्यवहार साक्षीदारासमक्ष झाला असून, त्या मोबदल्यात रोख पाच हजार शंभर रुपये देण्यात आले आहेत. व्यवहार पूर्ण झाला त्याच दिवशी इंदिराबाई पांडे यांनी सदरचा प्लॉट वसंता अर्जुन खंडारे यांच्या ताब्यात दिला. तेंव्हापासून ते आजमितीस तो प्लॉट खंडारे कुटुंबाच्याच ताब्यात आहे. वसंता खंडारे हे दि.४ एप्रिल २०२५ रोजी मयत झाले असले तरी त्यांचे वारस म्हणून त्यांचा मुलगा प्रदीप वसंता खंडारे हे त्या प्लॉटचे ताबेदार म्हणून कायम आहेत. सदर प्लॉटच्या चारही बाजूला लोखंडी अँगल रोवलेले असून ताब्यातील क्षेत्रफळात पत्र्याच्या खोल्या सुद्धा आजही उभ्या असल्याची माहिती प्रदीप खंडारे यांनी दिली आहे. मात्र




मध्यंतरी इंदिराबाई त्र्यंबकराव पांडे यांच्या ७/१२ वर वारस म्हणून कोणाचेही नाव नसतांना त्यांच्या मुलांनी सदर १६ नंबरचा प्लॉट १ सप्टेंबर १९६९ रोजी खरेदीखत करून देत परस्पर विक्री केला. त्या खरेदीखतासोबत कुठलेही कुलमुखात्यार पत्र जोडलेले नाही. त्यामुळे हा संपूर्ण व्यवहार बेकायदेशीर व आमची फसवणूक करणारा असल्याचा आरोप प्रदीप खंडारे करत आहेत. त्या बेकायदेशीर खरेदीखताची नक्कल जोडून सबंधित व्यक्ती आमच्या मालकीचा व ताब्यातील प्लॉट स्वतःच्या नावावर नोंद करून बळकावण्याच्या तयारीत असल्याचे खंडारे यांचे म्हणणे आहे. याबाबत आपण ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांच्याकडे हरकत घेतली असून त्या अनुषंगाने योग्य ते कागदपत्र पुरावे म्हणून सादर केले आहेत. मात्र सबंधित ग्राम महसूल अधिकारी यांची या प्रकरणात एकतर्फी वागणूक पाहता त्यांचा पैशावर डोळा असल्याचा संशय खंडारे यांनी व्यक्त केला आहे.

### वरिष्ठांचा सल्ला घेणे गरजेचे...

एकदा ताबेपावतीनुसार विक्री केलेल्या प्लॉटची वारसांनी पुन्हा विक्री करणे ही सरळ सरळ फसवणूक ठरू शकते. प्लॉटच्या मूळमालकाने सदर मालमत्ता कायमस्वरूपी मालकी ताबेपावतीनुसार विक्री केली आहे. तीच मालमत्ता त्या व्यक्तींच्या वारसांनी खरेदीखताद्वारे तिऱ्हाईत व्यक्तीला विक्री केली आहे. अशा गुंतागुंतीच्या प्रकरणात बऱ्याच कायदेशीर बाबी आणि दस्तऐवज बारकाईने तपासून पाहणे खुप महत्त्वाचे आहे. स्वतःच्या आर्थिक स्वार्थापोटी किंवा कर्तव्यातील आताताई म्हणून घेतलेला निर्णय एखाद्यासाठी कधीही भरून न निघणारे नुकसानकारक ठरू शकते. त्यासाठी अशा जटिल प्रकरणात वरिष्ठांचे मार्गदर्शन घेणे खुप गरजेचे आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला महापालिकेचा 1505.07 कोटीचा अर्थसंकल्प स्थायी मध्ये मंजूर

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** महापालिकेचा २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा मुळ अर्थसंकल्प आयुक्त सुनील लहाने यांनी शुक्रवारी स्थायी समिती सभेत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांना सादर केला. शहरात अंडरग्राउंड ड्रेनेज चा प्रकल्प लवकर मार्गी लावणे, शहरवासीयांना जिगाव प्रकल्पाचे पाणी उपलब्ध करून देणे, शहरातील जे रस्ते खोदून ठेवले आहेत त्या रस्त्यांची दुरुस्ती करणे, तसेच शहरवासीयांना सिटी बस ची सेवा लवकर उपलब्ध करून देणे तसेच विविध योजना व कामांवरील तरतुदीचा समावेश या अर्थसंकल्पात करण्यात आला. हा अर्थसंकल्प महसुली व भांडवली १.०९ कोटी संभाव्य शिलकीचा असला तरी प्रत्यक्षात काही कोटी रुपये महसुली तुटीचा आहे. महापालिकेचा २०२६ २७ चा मूळ अर्थसंकल्प १४५३.१३ कोटी रुपये जमेचा व १५०५.०७ रुपये खर्चाचा आणि १.०९ कोटी रुपये शिलकीचा आहे. आयुक्त सुनील लहाने यांनी करवाढ व दरवाढ न करता खर्चात काटकसर आणि उत्पन्न वाढीवर भर दिला आहे. आयुक्त सुनील लहाने म्हणाले की महापालिकेचा सुमारे १.०९ कोटीचा शिलकी अर्थसंकल्प असला तरी प्रत्यक्षात काही कोटी रुपयांची तूट आहे. त्यामुळे प्रत्यक्षात जमेचा विचार करून योजना राबविन्यावर भर दिला आहे. स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल म्हणाले की महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी केवळ कराच्या उत्पन्नावर अवलंबून राहता उत्पन्नाचे नवीन मार्ग शोधले जातील. स्थायी समितीच्या या अर्थसंकल्पीय या सभेत शहरातील पाणीटंचाईचा व गढूळ पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचा प्रश्न स्थायी समितीच्या सदस्यांनी उपस्थित केला त्यावर स्थायी समिती सभापतींनी लवकरच शहरातील पाण्याच्या टाक्यांची सफाई व महान वरून येणाऱ्या पाईपलाईन वरील अवैध कनेक्शन हटविण्याची कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले. तसेच नगरसेवक विनोद मापारी यांनी घंटा गाड्यांचा प्रश्न उपस्थित करीत या गाड्यां साठी नागरिकांकडून जे शुल्क वसूल केले जाते ते शुल्क टॅक्स मध्ये लावण्यात यावे अशी सूचना केली. सरते शेवटी एक मताने महापालिकेच्या या अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.



## पत्रकारांसाठी लावलेल्या टीव्हीवर अस्पष्ट आवाजाची समस्या कायम

सभागृहात बसण्यासाठी पत्रकारांना जागा उपलब्ध नसल्याने महापौरांच्या चेंबर समोर पत्रकारांना बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे या ठिकाणी लावण्यात आलेल्या टीव्हीवर केवळ चित्र स्पष्ट दिसते परंतु स्पष्ट आवाज येत असल्याने सभेत काय चालू आहे याचा काही एक अंदाज पत्रकारांना लागत नसल्याने पत्रकारांनी आज बजेटची सभा झाल्यानंतर आयुक्त व स्थायी समिती सभापतींची भेट घेऊन त्यांना आपली अडचण सांगितली तेव्हा पुढच्या सभेत ही समस्या सोडविण्याचे आश्वासन दोघांनी दिले.

## आयुक्तांचा करारी बाणा

◆ सभेच्या सुरुवातीलाच शिवसेना उद्धव ठाकरे गटातून शिवसेना शिंदे गटात गेलेल्या सागर भारुका यांनी येणारे धार्मिक सण पाहता सफाईच्या मुद्द्यावर प्रशासनाला दरडावणीच्या स्वरात जाब विचारायचा प्रयत्न केला असता, आयुक्तांनी त्यांना अधिकाऱ्यांशी उद्धट भाषेत बोलू नये असा सज्जड दम देत त्यांची बोलती बंद करून टाकली.

# शहरात देवी मंदिरात चैत्र नवरात्रोत्सवास प्रारंभ

♦ चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून मातेची उपासना

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** हिंदू नववर्षाची सुरुवात गुढीपाडव्याला देवी शक्तीच्या उपासनेने केली जाते. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्र सुरू होते. चैत्र नवरात्री हे सृष्टीतील उर्जेच्या उपासनेचे आणि निसर्गाच्या पुनर्जागरणाचे प्रतीक आहे. आजपासून शहरातील जवळपास सर्वच देवी मंदिरांमध्ये चैत्र नवरात्रोत्सवाचा उत्साह पाहायला मिळत आहे. अंबा माता मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन आज गुरुवारपासून चैत्र नवरात्रोत्सवाचा शुभारंभ घटस्थापनेने करण्यात आला. शहरातील माता राणीचे दरबार अतिशय सुंदररित्या सजले असून नवरात्रीनिमित्त मंदिरांमध्ये अखंड ज्योत प्रज्वलित करण्यात आली आहे. शहरातील बाग माता देवी मंदिर म्हणजेच अंबा माता मंदिर येथे नवरात्रीनिमित्त प्रतिपदेपासून दशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवासाठी अंबा माता मूर्तीचा अत्यंत नयनरम्य शृंगार करण्यात आला आहे.



उत्सवात दररोज आरती, अभिषेक, 'श्री आई'ची बैठक, भजन आणि सप्तशती पाठ होईल. २६ मार्चला अष्टमी असून महायज्ञ, महाआरती आणि दर्शन, २७ मार्च नवमीला भजन संध्या आणि महाप्रसादाचे आयोजन, २८ मार्चला घट विसर्जन करून उत्सवाचा समारोप होईल. मंदिर प्रशासनातर्फे सर्व भाविकांना या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आणि जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गांधीग्राम येथील पुलाचे काम कासवगतीने

♦ नागरिकांना ये-जा करण्यासाठी पर्यायी रस्त्याचा अभाव

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** गांधीग्राम परिसरातील पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुलाचे बांधकाम सुरू असताना पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

गांधीग्राम येथील पुलाचे बांधकाम सध्या सुरू असले तरी ते अत्यंत कासवगतीने सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या पुलाच्या कामामुळे मुख्य मार्ग बंद झाल्याने नागरिकांना ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.विशेष म्हणजे, पुलाचे काम सुरू करण्यापूर्वी कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, शेतकरी तसेच रोजंदारी करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाचे काम अनेक दिवसांपासून सुरू असले तरी त्यामध्ये कोणतीही ठोस प्रगती दिसून येत नाही. संथ गतीने सुरू असलेल्या या कामामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत आहे.लवकरात लवकर पुलाचे काम पूर्ण करावे तसेच नागरिकांसाठी तात्पुरता पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



# मोठ्या राम मंदिरात चैत्र नवरात्र महोत्सवास आरंभ

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** गजानन महाराजांचे निस्सीम भक्त स्व. बच्चुलाल अग्रवाल यांच्या प्रेरणे स्थापित मोठ्या राम मंदिरात चैत्र नवरात्र निमित्त कार्यक्रम सुरू आहेत. राम भक्त प्रल्हाद महाराज यांनी श्री राम जय राम जय जय राम या तेरा अक्षरी मंत्राचा जप करून मानव कल्याणाचा मार्ग दाखवला. त्या प्रल्हाद महाराज महिला राम जप मंडळाच्या वतीने व श्रीरामहरीहर संस्थान, श्री जानकी वल्लभो श्रीराम नगर मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले. गुरुवारपासून नवरात्र सुरू झाले. आणि राम प्रगटोत्सव हा सुद्धा गुरुवारी येत असल्यामुळे श्रीराम जय राम जय जय राम या तेरा अक्षरी मंत्राचा जप कार्यक्रम होणार आहे. श्रीराम आराधना, साधना किर्तन कार्यक्रमात मोठ्या संख्येत मातृशक्ती, युवाशक्ती तसेच रामभक्तांनी २१ मार्च शनिवार रोजी सकाळी अकरा वाजता उपस्थित राहावे अशी विनंती प्रल्हाद महाराज श्रीराम जय राम जय जय राम मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

**२१ रोजी श्री राम आराधना**

# नितीन मोरे यांची डवले एज्युकेशन सोसायटीला भेट

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** ग्राम व नागरी विकास सक्षमीकरण अभियानांतर्गत डवले एज्युकेशन सोसायटीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमासाठी अण्णासाहेब मोरे यांचे पुत्र नितीनजी मोरे यांचे विभाग सक्षमीकरण मेळावा अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

जागतिक स्पर्धेमध्ये टिकणे व विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य व क्षमतांचा विकास होणे , आंतरबाह्य परिपूर्ण विद्यार्थी निर्माण करणे यासाठी लवकरच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे त्याच्या तयारीसाठी नितीनजी मोरे यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम महाराजांचे पाद्यपूजन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश डवले व सचिव मृणाली डवले यांनी केले. प्राचार्य प्रकाश डवले यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख मांडला. संस्थेची विविध क्षेत्रातील भरारी तसेच प्रत्येक वर्षी बोर्डामधून विद्यार्थी प्रथम येण्याचे सातत्य तसेच शिक्षकांची दूरदृष्टी व उपक्रमांची मांडणी केली. नितीनजी मोरे यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल डवले एज्युकेशन सोसायटीचे अभिनंदन केले व विविध क्षेत्रात कार्य केल्याबद्दल प्राचार्य प्रकाश डवले यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.



कार्यक्रमाला संजय मेहसरे, सुनील खेड़कर,सुनील झगडे,शोभा मेहसरे ज्योती शेवतकर, मेघा नालट , नंदा झगडे , ज्योती खेडकर , , मेघा साठवणे स्वाती बोरोडे ,प्राची घिनमिने , रवीन्द्र तेलगोटे,सागर लोखंडे, पवन मेहसरे, कपिल अम्बेकर, वैभव फाटे,सतीश वरघट, किशोर स्वर्गे, श्याम सुलताने,निलेश रामेकर तसेच सेवेधारी उपस्थित होते.

# निंबा फाटा चौफुलीवर ट्रॅक्टर दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू

प्रतिनिधी २० मार्च

**हातरूण :** बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथून शेगावकडे जाणाऱ्या मार्गावर हॉटेल शिदोरीसमोर विरुद्ध दिशेने येणारा ट्रॅक्टर आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच हृदयद्रावक मृत्यू झाला. निंबा फाटा चौफुलीवर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. हा रस्ता सिमेंटचा झाल्यापासून येथे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. आज गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी ११ वाजेच्या सुमारास विरुद्ध दिशेने येणारा ट्रॅक्टर आणि दुचाकी यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच उरळ पोलीस स्टेशनचे पीएसआय गणेश कायंदे आणि वाहतूक पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शेगाव येथील जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. अपघातामुळे घटनास्थळावर नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. या चौकातील वाढते अपघात पाहता, प्रशासनाने येथे योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



# अवैध सिलेंडर वापरावर पुरवठा विभागाची धडक कारवाई

♦ शेगावसह जिल्ह्यात शेकडो सिलेंडर जप्त

प्रतिनिधी २० मार्च

**खामगाव:** इराण आणि अमेरिकेच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन अलर्ट मोडवर आले असून बुलढाणा जिल्ह्यात पुरवठा विभागाने अवैध सिलेंडर वापराविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. शेगावमध्येही घरगुती गॅस सिलेंडरचा गैरवापर होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली आहे.

इराण आणि अमेरिकेदरम्यान सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य परिस्थिती लक्षात घेता शासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. याचाच एक भाग म्हणून बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तेरा तालुक्यांमध्ये पुरवठा विभागाकडून अवैधरीत्या वापरल्या जाणाऱ्या घरगुती गॅस सिलेंडरविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे.शेगाव, खामगाव, नांदुरा, बुलढाणा, मलकापूर आणि देऊळगाव राजा या ठिकाणी तहसील प्रशासनाने धाडी टाकत शेकडो सिलेंडर जप्त केले आहेत. दरम्यान, शेगावमध्ये दोन दिवसांपासून सुरू असलेल्या कारवाईत घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार तहसीलदारांच्या आदेशाने संतोष बावणे आणि त्यांच्या पथकाने विविध हॉटेल्स आणि व्यावसायिक आस्थापनांवर छापे टाकले.या कारवाईत २१ घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले असून काही नामांकित हॉटेल्स आणि प्रसिद्ध व्यावसायिकांवरही कारवाई करण्यात आली आहे. तसेच येवले चहा या आस्थापनातही घरगुती सिलेंडरचा वापर आढळून आला आहे.प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला असून घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सांगितले आहे.

# गुढीपाडवा निमित्त संस्कार भारती व लिनेस क्लबचा सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** येथे गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संस्कार भारती आणि लिनेस क्लब अकोलाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा त्रिवेणी संगम पाहायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशाच्या वंदनेने झाली. यात लहान मुले आणि कलाकारांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर भगवान शंकरावर आधारित भावपूर्ण गीते आणि नृत्ये सादर करण्यात आली. कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सर्व प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. तसेच, माता सरस्वतीच्या वंदनेवर आधारित नृत्याने वातावरणात एक आध्यात्मिक प्रसन्नता निर्माण केली. स्थानिक कलाकार, विद्यार्थी आणि विविध सांस्कृतिक गटांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात सर्व सादरीकरणांना दाद दिली. या आयोजनाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि परंपरांचे सुंदर दर्शन घडवण्यात आले. अशा कार्यक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी जोडण्याची सुवर्णसंधी मिळते, असे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सर्व सहभागी कलाकारांच्या सन्मानाने आणि आभार प्रदर्शनाने झाला. या यशस्वी आयोजनात खालील मान्यवरांचा तन-मन-धनाने मोलाचा सहभाग लाभला. लिनेस क्लब प्रांताध्यक्षा कल्पनाजी देशमुख, अध्यक्षा राजश्री समनपूरे जयस्वाल, संस्कार भारतीच्या जिल्हा अध्यक्ष चंदा जायसवाल, सदस्य इंद्राणी देशमुख, प्रा. शारदा बियाणी, राजेश्री देशमुख प्रामुख्याने उपस्थित होत्या.



# गॅस संकटामुळे शहरात लाकूड, भुसा आणि कोळशाची मागणी वाढली

♦ अनेक हॉटेल व्यावसायिक कोळसा भट्ट्यांचा वापर करत आहेत

प्रतिनिधी २० मार्च

**अकोला :** ईराण-अमेरिका संघर्षाचे सावट आता अकोला शहराच्या जनजीवनावर आणि स्थानिक हॉटेल व्यवसायावर स्पष्टपणे दिसू लागले आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने शहरातील हॉटेल आणि ढाबा चालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. परिस्थिती अशी आहे की, शहरातील १०० हून अधिक लहान-मोठ्या हॉटेल्स आणि ढाब्यांमध्ये गॅसऐवजी आता चूल आणि भट्ट्यांवर जेवण बनवले जात आहे. लाकूड, भुसा आणि कोळशाचा आधार घेण्यास सुरुवात केली आहे.

युद्धाचा परिणाम आता शहरातील हॉटेल व्यवसायावरही होत आहे. गॅसच्या कमतरतेमुळे शासनाने व्यावसायिक सिलिंडरचे वितरण थांबवले आहे. हॉटेल व्यावसायिकांना व्यावसायिक सिलिंडर मिळत नाहीत, तर दुसरीकडे हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडर वापरल्यास प्रशासनाकडून कारवाई केली जात आहे. या कात्रीत सापडलेल्या हॉटेल व्यावसायिकांसमोर 'आता नक्की करायचे काय?' असा प्रश्न उभा राहिला आहे. व्यवसाय तर बंद ठेवता येत नाही, म्हणून शहरातील अनेक हॉटेल व्यावसायिकांनी जुन्या पद्धतीच्या कोळसा आणि लाकडाच्या भट्ट्या पेटवण्यास सुरुवात केली आहे. यामुळे शहरात गॅस संकट असताना लाकूड, भुसा आणि कोळशाची मागणी झपाट्याने वाढली आहे. शहरातील आरा मशीनवर बाभळीचे जळाऊ लाकूड सुमारे ७ रुपये प्रति किलो दराने विकले जात आहे, तर भुसा देखील याच दरात उपलब्ध आहे. शहरात लाकडी कोळशाच्या मागणीत मोठी वाढ झाली असून, सध्या त्याचा बाजारभाव ४० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे. तसेच कडी कोळसा १५ रुपये, बदाम कोळसा २० रुपये आणि हार्डकोल २६ रुपये प्रति किलो दराने विकला जात आहे. 'जर गॅसचा पुरवठा लवकर सुरळीत झाला नाही, तर येणाऱ्या दिवसात या पारंपरिक इंधनांच्या किमती आणखी वाढू शकतात, ज्यामुळे हॉटेल व्यवसायावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल,' असे हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे. 'ग्राहकांची सेवा सुरू ठेवण्यासाठी हॉटेल व्यावसायिक पर्यायी व्यवस्था करत आहेत. सरकारने गॅस सिलिंडरच्या टंचाईची समस्या लवकरात लवकर सोडवावी, कारण या व्यवसायावर आमच्यासह इथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची कुटुंबेही अवलंबून आहेत,' अशी प्रतिक्रिया हितेश पहु या हॉटेल व्यावसायिकाने दिली. गॅस संकटामुळे शहराच्या बाजारपेठेत सिमेंटच्या चुली आणि लोखंडी शेगड्यांची मागणी अचानक वाढली आहे. पूर्वी ही उत्पादने मर्यादित प्रमाणात विकली जात होती आणि मुख्यत्वे ग्रामीण भागातील ग्राहकच ती खरेदी करत असत. मात्र, युद्धाची परिस्थिती किती काळ टिकेल याची अनिश्चितता असल्याने, आता शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर चुलींची तात्पुरती दुकाने लागली आहेत. जेवण बनवण्यास अडचण येऊ नये म्हणून लोक मोठ्या प्रमाणावर या वस्तूंची खरेदी करत आहेत.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK